गुरुवार, २१ एप्रिल २०२२

◆ वर्ष १४ ◆ अंक २७३

www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड


## अंतरंग

कोतवाल येथील योजनेचे काम दोन महिन्यांत सुरू होणार/२

पनवेलच्या नवनाथनगरमध्ये आग; दोन घरांचे नुकसान/३

बंगळुरूचा लखनऊवर शानदार विजय/८

## राज्यात काजू, मोहाच्या दारूला विदेशीचा दर्जा



**मुंबई :** काजू आणि मोहाच्या फुलांपासून बनणार्‍या दारूला विदेशी दारूचा दर्जा देण्यात आला आहे. याबाबत बुधवारी (दि. २०) झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला. यापूर्वी या प्रकारच्या दारूला देशी दारूचा दर्जा देण्यात आला होता. आता काजू आणि मोहाच्या फुलांपासून बनवलेल्या बनलेल्या दारूला विदेशी दारूचा दर्जा देण्यात आला आहे. याशिवाय मद्य विक्री करणार्‍या दुकानांची इलाईट आणि सुपर प्रीमियम अशा दोन गटात वर्गवारी करण्यात आली आहे. त्यामुळे जी छोटी दुकान आहेत ते दुकानदार आता दुकानाचा विस्तार करून मद्य विक्रीची कक्षा वाढवू शकणार आहेत. इलाईट गट ६०० चौरस फुटांपर्यंत विस्तार करू शकणार आहेत, तर सुपर प्रीमियम गटातील दुकानदार ६०० चौरस फुटांच्यावरदेखील विस्तार करू शकणार आहेत.

# ठाकरे सरकारच्या घोटाळ्याचे तेरावे घालणार

## भाजप नेते किरीट सोमय्या यांचा इशारा

**मुंबई : प्रतिनिधी**

उद्धव ठाकरे सरकारने माझी तीन दिवस चौकशी करावी किंवा तेरा दिवस करावी, पण ठाकरे सरकारच्या घोटाळ्याचे तेरावे मी घालणार, असा इशारा भाजप नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी दिला आहे.

आयएनएस विक्रांत कथित मदतनिधी प्रकरणात भाजप नेते किरीट सोमय्या यांची बुधवारी (दि. २०) सलग तिसर्‍या दिवशी आर्थिक गुन्हे शाखेकडून चौकशी करण्यात आली. एकूण चार दिवस म्हणजे गुरुवारपर्यंत सोमय्या यांची चौकशी होणार आहे.

तिसर्‍या दिवशी चौकशी झाल्यानंतर माध्यमांशी बोलताना किरीट सोमय्या यांनी ठाकरे सरकारला पुन्हा एकदा इशारा दिला



आहे. आम्ही कसलाच घोटाळा केला नाही. त्यामुळे आम्हाला कसलीच भीती नाही, पण परवापासून एक एक अंक उघडणार आहे, असे सोमय्या म्हणाले.

संजय राऊत म्हणतात की आता मेधा सोमय्या यांच्याविरोधातदेखील गुन्हा दाखल होणार. उद्धव ठाकरे, तुम्ही माझ्या आईला विसरलेला दिसताय. ९० वर्षांच्या माझ्या आईने सांगितलेय उद्धव ठाकरेंना निरोप द्या की माझ्याविरुद्धही गुन्हा दाखल करा. सगळे सोमय्या चौकशीला सामोरे जायला तयार आहेत, असे किरीट सोमय्या म्हणाले.

उद्धव ठाकरे, त्यांचा परिवार आणि सरकार फक्त घोटाळे करून लोकांचे पैसे आणि रक्त शोषतायत, मात्र माफियांचे महाराष्ट्रात फार काळ चालणार नाही, अशा शब्दांत किरीट सोमय्यांनी निशाणा साधला.

### नील सोमय्यांनाही कोर्टाकडून दिलासा

आयएनएस विक्रांत प्रकरणात नील सोमय्या यांना न्यायालयाने दिलासा दिला आहे. नील सोमय्या यांच्यावर तूर्तास कोणतीही कठोर कारवाई न करण्याचे निर्देश न्यायालयाने पोलिसांना दिले आहेत. २५ ते २८ एप्रिलदरम्यान चौकशीला हजर राहण्याचे निर्देश देतानाच चौकशीला हजर राहून तपासात सहकार्य करावे, असेही कोर्टाने नील यांना सांगितले आहे. याबद्दल किरीट सोमय्या यांनी न्यायालयाचे आभार मानले.



## आमदार प्रशांत ठाकूर, उपमहापौर सीताताई पाटील यांच्या हस्ते पाणपोईंचे लोकार्पण

### नगरसेविका दर्शना भोईर यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या कार्यतत्पर नगरसेविका दर्शना भोईर यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त विविध सवेभावी उपक्रम मंगळवारी (दि. १९) राबविले. त्यांनी नगरसेवक निधीतून पनवेल शहरात दोन ठिकाणी पाणपोई उभारली आहे. या पाणपोईंचे लोकार्पण भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि उपमहापौर सीताताई पाटील यांच्या हस्ते झाले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी पुस्तक भेट देऊन नगरसेविका भोईर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

नगरसेविका दर्शना भोईर यांनी त्यांच्या नगरसेवक निधीतून पनवेल शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात असलेल्या पोलीस चौकीजवळ आणि रोझ बाजारमध्ये पाणपोई बसवली आहे. पोलीस चौकीजवळ उभारलेल्या पाणपोईचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते, तर रोझ बाजारमधील पाणपोईचे उपमहापौर सीताताई पाटील यांच्या हस्ते लोकार्पण झाले.

या लोकार्पण सोहळ्याला नगरसेविका रूचिता लोंढे, युवा नेते केदार भगत तसेच आबू करूड, साहेबराव घुमरे, आत्माराम लवाटे, ज्योती गुप्ता, राजू कोळी, अभिजित तळेकर, बन्सी कुठे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## गुणरत्न सदावर्तेंवर गुन्हे दाखल होण्याची मालिका सुरूच



**मुंबई : प्रतिनिधी**

वकील गुणरत्न सदावर्तेंवर गुन्हा दाखल होण्याची मालिका सुरूच आहे. मुंबई, सातारा, कोल्हापूर, अकोल्यानंतर आता सोलापुरातही त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

मराठा आरक्षणाच्या निकालासंदर्भात न्यायालयाचा अवमान केल्याबद्दल आणि दोन समाजांत तेढ निर्माण करणारे वक्तव्य केल्याप्रकरणी वकील सदावर्ते यांच्याविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. छावा संघटनेचे शहराध्यक्ष योगेश पवार यांनी याबाबत फिर्याद दिली आहे.

**सातारा कोर्टाकडून जामीन**

दरम्यान, सातारा सत्र न्यायालयाने अ‍ॅड. गुणरत्न सदावर्ते यांना जामीन मंजूर केला आहे. छत्रपती घराण्याबद्दल आक्षेपार्ह विधान केल्याप्रकरणी सातारा पोलीस ठाण्यात त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल झाला होता. दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या निवासस्थानावरील हल्ल्याप्रकरणी सदावर्ते यांना मुंबईतील कोर्टाने पुन्हा न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

## महाराष्ट्रात पुन्हा कोरोना रुग्णसंख्येत वाढ

### निर्बंध किंवा मास्कसक्तीचा विचार नाही -आरोग्यमंत्री



**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात गेल्या दोन दिवसांत कोरोना रुग्णसंख्या पुन्हा वाढू लागली आहे. या पार्श्वभूमीवर राज्यात महाराष्ट्रात पुन्हा एकदा निर्बंध लागणार का? मास्क सक्ती होणार का? याबाबत चर्चांना उधाण आलंय. यावर राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

वाढलेले रुग्ण ही चिंतेची बाब नसल्याचे नमूद करतानाच आपण परिस्थितीवर लक्ष ठेवून असल्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे म्हणाले. पाश्चात्य देश, युरोप, चीनमध्ये असलेली परिस्थिती जर आपल्याला जाणवली, तर त्या पद्धतीने आयसीएमआर, केंद्र सरकार, टास्क फोर्स, आरोग्य विभाग या सगळ्या गोष्टीत लक्ष ठेवून आहे. त्यामुळे पुन्हा निर्बंध लावणे किंवा मास्कसक्तीचा कोणताही विचार नाही. योग्य वेळी योग्य निर्णय घेतला जाईल, असे टोपे यांनी सांगितले.

आज काळजीचा विषय नाही. आपण निर्बंध हटविले आहेत. मास्कसक्ती हटवली आहे, पण ज्येष्ठ नागरिक किंवा सहव्याधी असणार्‍या व्यक्तींनी गर्दीत मास्क घालून काळजी घ्यावी, असे टोपे म्हणाले तसेच सर्वांनी लसीकरण करून घेण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे.

## निवडक

### दिल्लीत पुन्हा मास्क अनिवार्य; नियम मोडल्यास ५०० रु. दंड

**नवी दिल्ली :** कोरोनाचा आलेख घसरत असतानाच गेल्या काही दिवसांत देशात पुन्हा कोरोना रुग्णसंख्येत वाढ झाली आहे. दिल्लीत कोरोनाच्या वाढत्या रुग्णसंख्येच्या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा मास्क घालणे अनिवार्य करण्यात आले आहे. मास्क न लावल्यास ५०० रुपयांच्या दंडाची तरतूदही करण्यात आली आहे.

### प्रसिद्ध दिग्दर्शक, निर्माता टी रामाराव यांचे निधन

**चेन्नई :** प्रसिद्ध दिग्दर्शक आणि निर्माता तातिनेनी रामाराव (टी रामाराव) यांचे बुधवारी (दि. २०) निधन झाले. ते ८३ वर्षांचे होते. गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते. त्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. टी रामाराव यांनी तेलुगू, तमिळ आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील अनेक आघाडीच्या कलाकारांसोबत काम केले आहे.

## कर्जतची महिला पोलीस अधिकारी, कर्मचारी लाच घेताना जाळ्यात

**कर्जत : बातमीदार**

कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असलेल्या आरोपींना जामीन मिळावा यासाठी ५० हजारांची लाच घेताना कर्जत पोलीस ठाण्यातील महिला सहाय्यक निरीक्षक सुनीता अथाने आणि नाईक पदावरील सचिन नरुटे यांना बुधवारी (दि. २०) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या नवी मुंबई येथील पथकाने पकडले. याबाबत कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कर्जत तालुक्यातील नालधेवाडी येथे जमिनीची मोजणी करीत असताना कर्जत भूमिअभिलेख कार्यालयाच्या सर्वेअरला मारहाण झाली होती. शासकीय कामात अडवणूक आणि मारहाण केल्याप्रकरणी या गुन्ह्यात १५ जणांवर कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झालेला आहे. या गुन्ह्याचा तपास सहाय्यक निरीक्षक सुनीता अथने यांच्याकडे होता.

या गुन्ह्यातील न्यायालयीन कोठडी सुनावलेल्या तिघांना जामीन मिळण्यासाठी मदत करण्याकामी तसेच फरारी असलेल्या अन्य १२ जणांना गुन्ह्यात अटक न करता नोटीस देऊन सोडण्यासाठी तक्रारदारांकडे एक लाख रुपयांची मागणी करण्यात आली होती. तडजोडीअंती ५० हजार रक्कम देण्याचे ठरले होते. याबाबत तक्रारदारांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या नवी मुंबई येथील कार्यालयात तक्रार दिली होती.

या पार्श्वभूमीवर सापळा रचून पोलीस नाईक सचिन पमू नरुटे यांना तक्रारदाराकडून ५० हजारांची लाच कर्जत पोलीस ठाणे येथे स्वीकारल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले. त्याचप्रमाणे महिला सहाय्यक निरीक्षक सुनिता अथने यांनादेखील ताब्यात घेतले आहे.

## आरटीई प्रवेश प्रक्रियेस मुदतवाढ

**मुंबई : प्रतिनिधी**

शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रियेला २९ एप्रिलपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय प्राथमिक शिक्षण संचालनालयाने घेतला आहे. ५० टक्केही प्रवेश झाले नसल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.

आरटीई अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२२-२३साठी राज्यातील नऊ हजार ८६ शाळांमध्ये एक लाख एक हजार ९०६ जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. त्यासाठी दोन लाख ८२ हजार ७८३ विद्यार्थ्यांनी अर्ज केले. प्राथमिक शिक्षण संचालनालयाने काढलेल्या सोडतीमध्ये ९० हजार ६८५ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर करण्यात आले, तर प्रतीक्षा यादीत ६९ हजार ८५९ विद्यार्थी आहेत.

सोडतीत जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी २० एप्रिलपर्यंतची मुदत देण्यात आली होती, मात्र प्रवेश प्रक्रियेत आतापर्यंत ३६ हजार ५०० विद्यार्थ्यांचेच प्रवेश झाल्याचे दिसून येत आहे.

## भावपूर्ण श्रद्धांजली



पनवेल नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष

**जानूशेठ कानाशेठ म्हात्रे**

यांचे मंगळवार, दि. १२ एप्रिल २०२२ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना!

**दशक्रिया विधी**

गुरुवार, दि. २१ एप्रिल २०२२ रोजी श्री श्रेत्र नाशिक येथे होणार आहे.

**तेरावा विधी**

रविवार, दि. २४ एप्रिल २०२२ रोजी राहत्या घरी होणार आहे.

**शोकाकूल**

| | |
|---|---|
| बाळकृष्ण जानू म्हात्रे | दीपक गुरुनाथ म्हात्रे |
| मनोहर जानू म्हात्रे | राजू गुरुनाथ म्हात्रे |
| गुरुनाथ काना म्हात्रे | विनायक अंबाजी म्हात्रे |
| अंबाजी काना म्हात्रे | हरेश अंबाजी म्हात्रे |
| रामभाऊ माया म्हात्रे | हर्षल बाळकृष्ण म्हात्रे |
| किशोर बबन म्हात्रे | मंदार बाळकृष्ण म्हात्रे |
| चंद्रकांत बबन म्हात्रे | निरांत परशुराम म्हात्रे |
| महेंद्र बबन म्हात्रे | सिद्धार्थ मनोहर म्हात्रे |

गिरीश गुरुनाथ म्हात्रे

**समस्त म्हात्रे परिवार, धाकटा खांदा**

(ता. पनवेल)

टीप : मामाशिवाय कुणीही दुखवटा आणू नये.

# न्हावेखाडीत जल्लोष सुवर्णयुगाचा कार्यक्रम रंगला





### मान्यवरांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील न्हावेखाडी उत्तरपाडा येथे श्री म्हसेश्वर देवाची यात्रा गुरुवारी आहे. या यात्रेनिमित्त मंगळवारी (दि. १९) स्टेप आर्ट डान्स अ‍ॅकॅडमीच्या वतीने जल्लोष सुवर्णयुगाचा हा मनोरंजनात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट दिली.

यात्रेनिमित्त स्टेप आर्ट डान्स अ‍ॅकॅडमीच्या वतीने जल्लोष सुवर्णयुगाचा हा नृत्य आणि हास्याचा कार्यक्रम रंगला. आई तुझा डोंगर गाण्याचे गायक अमोल जाधव हे या कार्यक्रमाचे खास आकर्षण होते. या वेळी पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर, कान्हाशेठ ठाकूर, शकुंतला रामशेठ ठाकूर, देवकीबाई ठाकूर, अरुण ठाकूर, कामगार नेते सुरेश पाटील, दा. चां. कडू, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, मदन ठाकूर, न्हावे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच जितेंद्र घरत, सदस्य सागर ठाकूर, पं. स. सदस्य तथा महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, वर्षा प्रशांत ठाकूर, अर्चना परेश ठाकूर, महिला मोर्चा शहर अध्यक्ष वर्षा नाईक, माजी नगरसेविका कल्पना ठाकूर, ज्योती सागर ठाकूर, चंद्रकांत घरत, गव्हाण ग्रामपंचायतीच्या सदस्य योगिता भगत, सुजाता पाटील, सुहास भगत आदी पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते गायक अमोल जाधव यांचा सन्मान करण्यात आला.

# कोतवाल लघू पाटबंधारे योजनेचे काम दोन महिन्यांत सुरु होणार

## विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांच्यासमवेत झालेल्या बैठकीतील निर्णय



**मुंबई : रामप्रहर वृत्त**

पोलादपूर तालुक्यातील कोतवाल येथील कोतवाल लघू पाटबंधारे योजनेच्या अनुषंगाने येत्या १५ दिवसांत सर्व कागदपत्रांची पूर्तता करून पुढील दोन महिन्याच्या कालावधीत योजनेचे काम प्रत्यक्ष सुरु करण्याचे आदेश मृद व जलसंधारण मंत्री शंकरराव गडाख यांनी बुधवारी (दि.२०) दिले. विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेता प्रविण दरेकर यांनी सदर योजनेच्या समस्यांसंदर्भात सातत्याने पाठपुरावा करुन ही योजना लवकरात लवकर पूर्ण करुन ग्रामस्थांच्या पाण्याच्या प्रश्न तातडीने सोडविण्याची मागणी लावून धरली होती.

मृद व जलसंधारण मंत्री शंकरराव गडाख यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात यासंदर्भात बैठक पार पडली. या बैठकीला विरोधी पक्ष नेता प्रविण दरेकर यांच्यासह आमदार भरत गोगावले उपस्थित होते. या बैठकीत कोतवाल धरणाच्या प्रकल्पासंदर्भात अंतिम टप्प्यात चर्चा करण्यात आली. भूसंपादनाची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करुन येथील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यावर तातडीने मोबदल्याची रक्कम जमा करण्यात येईल. तसेच कोतवाल धरणासाठी सुधारित प्रशासकीय मान्यता काढण्याचे आदेशही गडाख यांनी या बैठकीत दिले.

# रोहा तालुक्यातील ३२ जि. प. शाळांची दूरवस्था

## पावसाळ्यापूर्वी दुरुस्तीची पालक, शिक्षणप्रेमींची मागणी

**रोहे : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या रोहा तालुक्यातील ३२ शाळा इमारती नादुरुस्त झाल्या आहेत. त्यांच्या दुरुस्तीचा प्रस्ताव रोहा पंचायत समिती शिक्षण विभागाने जिल्हा परिषदेकडे पाठविलेला आहे. २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाकरीता शाळा सुरू करण्यात येणार आहेत. तत्पुर्वी तालुक्यातील या नादुरुस्त ३२ शाळांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे.



(छाया : महादेव सरसंबे)

रोहा तालुक्यात रायगड जिल्हा परिषदेच्या २५४ शाळा होत्या. कालांतराने पटाअभावी २२ शाळा मागील काही वर्षात बंद करण्यात आल्या. उर्वरित २३२ शाळा तालुक्यात सध्या चालू आहेत. कोरोनामुळे गेल्या दोन वर्षात या शाळा प्रत्यक्षात भरल्याच नाहीत. या दोन वर्षांत निसर्ग, तौक्ते चक्रीवादळ यामुळे तालुक्यातील २३२ पैकी काही शाळांची मोठ्या प्रमाणात पडझड झाली होती. त्यापैकी काही शाळांची कौले बदलणे, भिंत बांधणे यासह अन्य कामे करण्यात आली. तरीही तालुक्यातील २०० शाळा चांगल्या स्थितीत आहेत. उर्वरित ३२ शाळा नादुरुस्त आहेत.

शासनाने परवानगी दिल्याने २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात जिल्हा परिषद शाळा सुरु होणार आहेत. त्यातच दिड महिन्यात पावसाळा सुरू होणार आहे. शाळा सुरू होण्याआधी रोहा तालुक्यातील ३२ शाळांची दुरुस्ती, डागडुजी करणे आवश्यक आहे. रोहा तालुक्यात आधीच शिक्षक कमी आहेत. त्यात १८ शाळांत सेमी इंग्रजी शिक्षण चालू होणार आहे. या ३२ शाळांची दुरुस्ती झाली नाही तर विद्यार्थी बसणार कुठे व शिक्षक शिकवणार कसे हा प्रश्न समोर येत आहे. दरम्यान, तालुक्यातील ३२ शाळांच्या दुरुस्तीचा प्रस्ताव रायगड जिल्हा परिषदेकडे पाठविल्याचे रोह्याच गट शिक्षणाधिकारी सादुराम बांगारे यांनी सांगितले.

# पेण हनुमानपाडा येथून सागाची लाकडे जप्त

(छाया : अनिस मनियार)



**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील हनुमानपाडा येथे सुमारे १३ हजार रुपये किंमतीची सागवान लाकडे पेणचे वनक्षेत्रपाल के. बी. काटकर यांनी जप्त केली. यासंदर्भात तिघांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पेण वन क्षेत्रपाल कार्यालयाचे वन क्षेत्रपाल के. बी. काटकर यांना हनुमानपाडा गावात काही इसमांनी बेकायदेशीररित्या सागवान लाकडे आणली असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार काटकर यांनी आपल्या सहकाऱ्यांसह हनुमानपाडा गावात जाऊन संतोष मोरे, सुधाकर पाटील, विकास मोरे यांच्या घरी धाड टाकली. या वेळी संतोष मोरे याच्या घरी तीन हजार १५७ रुपये किंमतीचे सागचिरीचे २१ नग, सुधाकर पाटील याच्या घरी दोन हजार ८८६ रुपये किंमतीचे साग चौपट व गोल असे सहा नग तर विकास मोरे याच्या घरी सागचिरीचे सात हजार ५०८ रुपये किंमतीचे ३० नग असे एकूण १३ हजार ५५१ रुपये किंमतीचा माल सापडला. हा माल कुठून आणला याबाबत तिघांनाही माहिती देता आली नाही.

संतोष मोरे, सुधाकर पाटील व विकास मोरे यांच्यावर भारतीय वन अधिनियम १९२७ कलम ४१,४२ (२) अन्वये वन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास बेलवडे येथील वनपाल विष्णू भासवले हे करीत आहेत.

# कर्जतच्या बेडीसगाव भागातील ४१ बकऱ्या गायब

## नेरळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील बेडीसगाव येथील आदिवासी शेतकऱ्यांच्या जंगलामध्ये चरायला गेलेल्या ४१ बकऱ्या १४ एप्रिलपासून गायब आहेत. हिंस्त्र प्राण्यांनी त्या बकऱ्या फस्त केल्याचा संशय आहे तर आदिवासी शेतकऱ्यांनी आपल्या बकऱ्या चोरीला गेल्या असल्याची तक्रार नेरळ पोलीस ठाण्यात गेली आहे. दरम्यान, बकऱ्या हरवल्याने या आदिवासी बांधवांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

कर्जत तालुक्यातील शेलू ग्रामपंचायत हद्दीतील बेडीसगाव गावामधील नऊ पाड्यात आदिवासी लोकांची वस्ती आहे. त्यापैकी सहा शेतकरी यांच्या बकऱ्या जंगलात चरायला सोडल्या होत्या.

## रामचंद्र मुणगेकर — दुखवटा

**मुंबई :** छायाचित्रकार रामचंद्र मुणगेकर यांचे (वय ६८) सोमवारी (दि. १८) रात्री १० वाजता नायर रुग्णालयात निधन झाले. गेले दोन आठवडे त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी आणि आई असा परिवार आहे. दरम्यान बोरीवली येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.



## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत त्यांचे विद्यमान मालक **श्री. वामन विठ्ठल नवाळी** यांचेकडून कायमस्वरूपी ही सामाईक मिळकत विकत घेण्याबाबतचा व्यवहार आमचे **अशिल श्री. भरत नवनाथ रावते** यांनी ठरविला आहे व या व्यवहाराची जाहीर नोटीस देण्याबाबत विद्यमान मालकांनी संमती दिलेली आहे.

मिळकतीचे वर्णन : मौजे हरिश्चंद्र पिंपळे, ता. उरण, जि. रायगड.

| गट क्रमांक | हिस्सा क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे. आर) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| ४७ | ३ | २ | ०-१६-०० | २.०० |
| | | एकूण क्षेत्रफळ | ०-१६-०० | |

वर वर्णन केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या मालकीची व ताबे कब्जाची आहे. सदरील मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकाने दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविला आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध, बोजा, गहाण, दान, लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स मेहेर, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क, हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींना सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधितांच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत आणून द्यावी. या प्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आम्ही सदर व्यवहार पूर्ण करू व नंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही हे सर्वांस कळावे.

**दिनांक : २०/०४/२०२२**

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**
**बी-१०४, सफायर सी.एच.एस.**
**भूखंड - क्रमांक ३३/३४, सेक्टर २२,**
**कामोठे, तालुका पनवेल,**
**जिल्हा- रायगड- ४१०२०६**
**मो.क्र. ९९२०४७५८०१**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, मौजे शिरढोण, ता. पनवेल, जि. रायगड येथील एंन्जल लॅन्ड को. ऑप. हौसिंग सोसायटी लि.मधील **श्री. संजय गजानन पाटकर व श्री. रघुनाथ चंदर घरत** यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, खुद्द स्वरुपाची खालील वर्णनाची बिनशेती जमीन व आर.सी.सी. बांधकाम असलेले घराचे वर्णन खालीलप्रमाणे आमचे अशिलांनी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**बिनशेती जमीन व आर.सी.सी. बांधकाम असलेले घराचे वर्णन खालीलप्रमाणे**
**मौजे-शिरढोण, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड.**

| गट नं./ हिस्सा नं. | बिनशेती प्लॉट नं. | क्षेत्र चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ४००/३ | ए-९ | ३४४.५२ | ३४.४५ |

सबब वर नमूद बिनशेती जमीन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाच्याही कोणत्याही प्रकारच्या हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज एम.ओ.यू. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून **१४ दिवसाच्या आत** हक्क हितसंबंधाचे स्वरुप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमूद मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**दिनांक : २०/०४/२०२२**

**सही/-**
**श्री. अमोल एस. साखरे**
**शॉप नं. १२८, नगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, पनवेल,**
**ता. पनवेल, जि. रायगड.**
**मो. ८६५२२३३७७१/९३२४३७२१६६**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल, १. श्री. पराग दिनेशचंद्र सरकार, २. श्रीमती . संगिता पराग सरकार, ३ . श्री. सुनिप पराग सरकार हे मुळ लायसेन्सी १. श्रीमती भानुमती तुळशीराम दापोलकर, २ . श्रीमती भारती भास्कर मुंगाजी, ३. श्री. स्वप्नील भास्कर मुंगाजी, ४. श्री. धरमवीर भास्कर मुंगाजी, ५. श्रीमती भाग्यश्री भास्कर मुंगाजी यांचेकडुन रजिस्टर ट्रायपार्टी कराने विकत घेणार आहेत व हस्तांतरीत करून आहेत. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

**मौजे पुष्पकनगर (दापोली), ता. पनवेल, जि. रायगड येथील भुखंड नं २०८, सेक्टर नं ३, क्षेत्र २२० चौ. मी.**

वर नमूद केलेल्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तिच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदी खत, साठेकरार, मिळकत विकसीत करणेबाबतचा करार, कुलहक्क, वहीवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथम दर्शनी योग्य त्या पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिध्द झाले पासून १५ दिवसाच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे. असे समजून आमचे अशिल १. श्री. पराग दिनेशचंद्र सरकार, २. श्रीमती . संगिता पराग सरकार, ३. श्री. सुनिप पराग सरकार हे मुळ लायसेन्सी सोबत ट्रायपार्टी करार रजिस्टर करून घेतील व वरील मुदती नंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

पनवेल
२१.०४.२०२२

**सही/-**
**श्री. पराग पी. म्हात्रे**
(ॲडव्होकेट हाय कोर्ट व नोटरी)
११, केशव वसंत, जुने तहसील कार्यालयासमोर, पनवेल,
ता. पनवेल, जि. रायगड.


## URGENTLY REQUIRED

**Following Candidates for sites across Maharashtra.**

- **Fitter -** ITI Diploma - Minimum 3 to 5 Years Exp.
- **Electrician -** ITI Diploma -Minimum 3 to 5 Years Exp.
- **Welder -** ITI Diploma -Minimum 3 to 5 Years Exp.
- **Fitter -** ITI Diploma -Minimum 3 to 5 Years Exp.
- **Senior Welder -** ITI Diploma -Minimum 10 Years Exp.
- **Senior Fitter -** ITI Diploma -Minimum 10 Years Exp.
- **Senior Electrician -** (PLC Operation) - ITI Diploma-Minimum 10 Years Exp.
- **LMV Driver -** Minimum 1 year Exp.(with proper license)
- **Computer Operator -** Minimum 2 Years Exp. (with Graduation)

*Interested Candidates may email/submit their resume at the address given below :*

**M/s. Thakur Infraprojects Pvt. Ltd.**
1st floor, Om Sadnika Bldg., Plot No.265/1,
Uran Naka, Panvel - 410 206, Navi Mumbai. State
Maharashtra, Ph. 022-27452713, 9769409120
email - thakurinfraprojects@gmail.com
websit : www.thakurinfraprojects.in


क्र.रोनप/संगणक/जा.नि.सूचना प्रसिद्धी/८३/२०२२
**रोहा नगर परिषद, रोहा, जि. रायगड.**
email : rohanagarpalika@gmail.com
दिनांक : १९-०४-२०२२.

## जाहीर निविदा सूचना

रोहा नगर परिषदेच्या विविध विभागास सन २०२२-२३ करिता विविध साहित्य व सेवा पुरवठा करणेकामी विहीत नमुन्यात वार्षिक दरपत्रके मागविणेत येत आहेत त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| क्र. | तपशील | निविदा फॉर्म फी | बयाणा रक्कम |
|---|---|---|---|
| १. | नगर परिषद कार्यालयातील संगणक हार्डवेअर साहित्याची देखभाल व दुरुस्ती करणे आणि आवश्यकतेनुसार हार्डवेअर साहित्याचा व लायसन्स सॉफ्टवेअर साहित्याचा पुरवठा करणे. | १०००/- | १००००/- |
| २. | नगर परिषदेस आवश्यकतेनुसार फोटोग्राफी व व्हिडिओ शुटींग सेवा पुरविणे. | ५००/- | ५०००/- |
| ३. | नगर परिषदेच्या कर्मचाऱ्यांना गणवेश व्यतिरिक्त इतर साहित्याचा पुरवठा करणे. | १०००/- | १००००/- |
| ४. | नगर परिषदेस आवश्यकतेनुसार विद्युत साहित्याचा पुरवठा करणे. | १०००/- | १००००/- |
| ५. | नगर परिषदेच्या जनरेटरची वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे. | ५००/- | ५०००/- |
| ६. | नगर परिषदेच्या मालकीच्या इमारतीमधील वातानुकूलीन यंत्रणेची व वॉटर कुलर विथ प्युरिफायरची देखभाल व दुरूस्ती करणे. | १०००/- | १००००/- |
| ७. | रोहा नगर परिषदेचे भुवनेश्वर जलशुध्दीकरण केंद्र येथील क्लोरीनेशन प्लॅटची देखभाल व दुरूस्ती करणे आणि आवश्यकतेनुसार क्लोरीन सिलेंडरचा पुरवठा करणे. | १०००/- | १००००/- |
| ८. | पाणीपुरवठा विभागास आवश्यकतेनुसार चेकनट व स्पिंडल दुरूस्ती करणे तसेच आवश्यकता भासलेस नविन पुरवठा करणे. | २००/- | २०००/- |
| ९. | डोलवहाळ पंपहाऊस येथील रोहित्र (Transformers) ची वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे. | ५००/- | ५०००/- |

**अटी व शर्ती :-**

१) विहित नमुन्यातील निविदा पत्रे/फॉर्मची विक्री नगर परिषद कार्यालय, रोहा येथे **दिनांक २१-०४-२०२२ ते दिनांक ११-०५-२०२२** पर्यंत कामकाजाचे दिवशी कार्यालयीन वेळेत निविदा पत्रे/फॉर्म रक्कम रूपये वर उल्लेख केल्याप्रमाणे नगर परिषद कार्यालयात रोखीने भरून निविदा पत्रे/फॉर्म प्राप्त करून घेता येतील.
२) निविदा फॉर्ममधील सर्व अटी व शर्ती निविदा सादर करताना बंधनकारक राहतील.
३) विहित पद्धतीने दर नमूद केलेली दरपत्रके नगर परिषद कार्यालयात नोंदणी शाखेत **दिनांक १२-०५-२०२२ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत** किंवा तत्पूर्वी रोहा नगर परिषद कार्यालय, रोहा येथे दाखल करता येतील. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या निविदा **दिनांक १३-०५-२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता** उघडणेत येतील.
४) कोणतेही कारण नमूद करून अथवा असे कारण न देता आलेल्या निविदा स्विकारणे अथवा फेटाळणेचा अधिकार नगर परिषदेने राखून ठेवलेला आहे.

**सही/-**
**(दयानंद गोरे)**
**मुख्याधिकारी**
**रोहा नगर परिषद**

## पनवेल महानगरपालिका
## आयुक्त, पनवेल महानगरपालिका, पनवेल
## ता. पनवेल, जिल्हा-रायगड, पनवेल ४१० २०६ यांचे कार्यालय

दुरध्वनी कार्यालय : ०२२- २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२- २७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२- २७४५५७५१ आयुक्त कार्यालय : ०२२-२७४५२३३९
ई-मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट : www.panvelcorporation.com

### शुद्धीपत्रक
### वाचा :- जाहिरात दिनांक १९/४/२०२२.

**: सेवानिवृत्त अधिकारी यांच्या सेवा करार पद्धतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबत :**

पनवेल महानगरपालिकेमध्ये विवक्षित कामकाजाकरीता शासकीय/निमशासकीय कार्यालय/सिडकोकडील, तसेच नगरपरिषद/नगरपालिका/महानगरपालिकेच्या सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्यांकरीता, करार पद्धतीने सेवा प्राप्त करुन घेण्यासाठी दिनांक १९/०४/२०२२ रोजी दैनिक वृत्तमानस आणि दैनिक किल्ले रायगड या दैनिकामध्ये जाहिरात प्रसिद्ध झाली होती. सदर जाहिरातीमध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

| प्रसिद्ध झालेला मुलाखतीचा दिनांक | सुधारीत मुलाखतीचा दिनांक |
|---|---|
| २२/०४/२०२२ | २६/०४/२०२२ |

या व्यतिरिक्त जाहिरातीमध्ये कोणताही बदल नाही.

जाहिरातीच्या दिनांकात झालेल्या बदलाबाबतची माहिती पनवेल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**सही/-**
**उप आयुक्त (मुख्यालय)**
पनवेल महानगरपालिका





## पनवेल भाजपतर्फे जनहितार्थ माहितीसाठी

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**गुरुवार, दि. २१ एप्रिल २०२२ रोजी होणारे**

# कोरोना प्रतिबंधक लसीकरण

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स**

**सर्व केंद्रांवर (वयोगट :** १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल ■ ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ■ ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, कळंबोली ■ ८. उपजिल्हा रूग्णालय, पनवेल

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पुर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**

### Precautionary Dose बाबत माहिती

- शासकीय कोविड लसीकरण केंद्रांमध्ये ६० वर्ष वरील नागरीकांना, तसेच FLW, HCW यांना दुसरा डोस घेऊन ९ महिने (३९ आठवडे/२७३ दिवस) झालेल्या लाभार्थ्यांना Precautionary Dose पूर्वीप्रमाणेच उपलब्ध होणार आहे.
- दि. १०.०४.२०२२ पासून सर्व खासगी कोविड लसीकरण केंद्रांमध्ये १८-५९ वर्ष (Year of birth 1963-2004) वरील नागरीकांचे दसरा डोस घेऊन ९ महिने(३९ आठवडे/२७३ दिवस) झालेल्या नागरीकांना Precautionary Dose उपलब्ध होणार आहे.
- खासगी कोविड लसीकरण केंद्रांमध्ये लसीकरण **सशुल्क** असणार आहे.
- **१८-५९** वय नागरीकांचे Precautionary Dose हे **फक्त खाजगी कोविड लसीकरण केंद्रांमध्ये** उपलब्ध असेल.
- या लसीकरणाकरीता **कुठलेही नविन रजिस्ट्रेशन** करण्याची आवश्यकता नाही.
- **१८-५९** वय नागरीकांचे Precautionary Dose च्या लाभार्थ्यांनी दुसऱ्या डोस चे सर्टिफिकेट/दुसरा डोस घेताना वापरलेला ID Proof व दुसऱ्या डोस करीता दिलेला मोबईल नंबर लसीकरण केंद्रावर सोबत घेऊन जावा.
- या लसीकरीताची शुल्क रु. २२५+GST + रु. १५० पर्यंत सर्विस शुल्क शासनाने ठरविले आहे. लागणार आहे. मामाजबाबदारा
- नागरिकांना लस घेताना पहिले दोन डोस ज्या लसीचे घेतले आहेत तीच लस Precautionary Dose साठी घ्यावी लागणार आहे.
- लाभार्थ्यांना कोविन ॲपवर कोणत्या खासगी लसीकरण केंद्रांवर लसीकरण सुरु आहे हे दिसणार आहे त्याप्रमाणे कोविन ॲपवर वर Online Booking करुन किंवा प्रत्यक्ष लसीकरण केंद्रांवर देखील Booking करुन लस घेता येईल.

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते
# आय लव्ह कामोठे शिल्पाचे लोकार्पण






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठे येथील भारतीय जनता पक्षाचे नगरसेवक दिलीप पाटील आणि विजय चिपळेकर यांच्या माध्यमातून 'आय लव्ह कामोठे' हे शिल्प सेक्टर ३५ येथील पुरातन श्री गणेश मंदिराजवळ उभारण्यात आले आहे. या शिल्पाचे लोकार्पण भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते मंगळवारी (दि. २०) झाले. या वेळी बोलताना त्यांनी या शिल्पामुळे कामोठ्याच्या सौंदर्यात आणखी भर पडली असून हे एक आकर्षणाचे केंद्र बनेल, असे प्रतिपादन केले.

या लोकार्पण सोहळ्याला नगरसेवक विजय चिपळेकर, दिलीप पाटील, नगरसेविका कुसुम म्हात्रे, पुष्पा कुत्तरवडे, भाजपचे कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, प्रकाश पाटील, ओबीसी सेल जिल्हा अध्यक्ष राजेश गायकर, संतोष म्हात्रे, प्रदीप भगत, रवींद्र म्हात्रे, आनंदी गोवारी, संभाजी चिपळेकर, मयूर चिपळेकर, युवराज पाटील, शहर सरचिटणीस शरद जगताप, प्रीतम तांबडे, भटके विमुक्त आघाडीच्या महिला अध्यक्ष विद्या तामखडे, महिला मोर्चा कामोठे शहर अध्यक्षा वनिता पाटील, वर्षा शेलार, ज्येष्ठ नेते सुधाकर पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



# पनवेल नवनाथनगरमध्ये आग; दोन घरांचे नुकसान

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल येथील नवनाथ नगर वसाहत येथे शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची घटना बुधवारी (दि. २०) घडली. घटनेची माहिती मिळताच अग्नीशमन दल घटनास्थळी दाखल होत आगीवर नियंत्रण मिळवले. या आगीच्या घटनेमध्ये कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी शंकर कन्नाके आणि उत्तम शिंदे यांच्या घराचे मोठे नुकसान झाले आहे.

याबाबत माहिती मिळताच महापौर डॉ. कविता चौतमोल यांनी घटनास्थळी दाखल होत परिस्थितीचा आढावा घेतला. या वेळी प्रभाग समिती 'ड'च्या सभापती वृषाली वाघमारे, नगरसेविका चारुशीला घरत, दर्शना भोईर, फायरब्रिगेडचे अधिकारी अनिल जाधव उपस्थित होते.







**पनवेल : सुकापूरच्या सरपंच योगिता पाटील यांचा वाढदिवस भाजपच्या तालुका व शहर मध्यवर्ती कार्यालयात साजरा करण्यात आला. त्यांना भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी जि. प. सदस्य अमित जाधव, पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, सोशल मीडिया सेल तालुका संयोजक राजेश पाटील, ज्येष्ठ नेते हनुमंत खुटले, आत्माराम पाटील, सुकापूर उपसरपंच देवेश भगत, ग्रामपंचायत सदस्य प्राची जाधव, पूनम भगत, नेरे विभागीय अध्यक्ष सुनील पाटील, महिला मोर्चा तालुका चिटणीस प्रिया वाघमारे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

# रेल्वे सिग्नल केबलच्या चोरीप्रकरणी त्रिकूट अटकेत

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल हर्बर रेल्वे मार्गावरील सिग्नल यंत्रणेला कंट्रोल करणाऱ्या, सिग्नल लोकेशन बॉक्समधील केबलची वायर दारूच्या नशेसाठी तोडून त्याची भंगारात विक्री करणाऱ्या आरोपीच्या मुसक्या आवळण्यात पनवेल रेल्वे सुरक्षा बल यांना यश आले आहे. या प्रकरणी तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

या तीन आरोपींनी अन्य दोन मित्राच्या मदतीने पनवेल रेल्वेस्थानक परिसरातील पोल नंबर ४८ जवळील सिग्नल लोकेशन बॉक्समधील केबल चोरली होती. या केबल चोरीमुळे पनवेल हर्बर रेल्वे मार्ग चार तास ठप्प झाला होता.

सुनील लोंगरे, अनिल लोंगरे, आकाश कोळी, रईश सय्यद, सईद अब्दुल सलाम असे पाच संशयीत आरोपींची नावे आहेत. या पाच आरोपींनी संगनमतांनी १३ एप्रिल रोजी पनवेल रेल्वे स्थानक परिसरातील पोल नंबर ४८ जवळील सिग्नल यंत्रणेला कंट्रोल करणाऱ्या लोकेशन बॉक्स मधील केबल ची चोरी करून पोबारा केला होता. या केबल चोरीमुळे १३ एप्रिल रोजी पहाटे एक ही लोकल सीएसटीच्या दिशेने धावू शकली नाही त्या मुळे, पनवेल, खांदेश्वर, मानसरोवर, खारघर रेल्वे स्थानकात रेल्वे प्रवाशांची तोबा गर्दी झाली होती.

तब्बल चार तास रेल्वे सेवा ठप्प झाली होती. या चोरीच्या प्रकारा नंतर, रेल्वे सुरक्षा दलाच्या जवानांनी आरोपीचा शोध घेण्यास सुरवात केली, त्या वेळी हे चोरटे रेल्वेस्थानकाच्या शेजारी असलेल्या झोपडपट्टी परिसरातील आहेत. या अधिक तपास केल्या नंतर दोन आरोपींना या जवानांनी पनवेल मधून अटक केली. या आरोपींना अटक केल्या नंतर अन्य साथीदाराचा शोध घेण्यास मदत मिळाली, त्या पैकी तीन आरोपी अटक असून दोन आरोपीचा शोध पोलीस घेत आहे.

## महाराष्ट्र दिन पूर्वतयारी बैठक

**नवी मुंबई** : महाराष्ट्र दिनाच्या अनुषंगाने बुधवारी (दि. २०) पूर्वतयारीची बैठक कोकण विभागाच्या सामान्य शाखेचे उपायुक्त मनोज रानडे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. कोकण भवनात झालेल्या या बैठकीस अधिकारी, कर्मचारी हजर होते.

कोरोनाचे निर्बंध शिथिल झाल्यानंतर १ मे रोजी महाराष्ट्र दिन ध्वजारोहणाचा कार्यक्रम उत्साहात आणि जल्लोषात साजरा करावा, असे शासनाचे निर्देश आहेत. बैठकीत मार्गदर्शन करताना उपायुक्त रानडे यांनी कोकण सर्व यंत्रणांना हा सोहळा यशस्वी व उत्साहात साजरा करण्याबाबत सूचना केल्या. कार्यक्रम कळंबोली पोलीस मुख्यालय मैदानावर होणार आहे.

# नवीन पनवेल पोदी शाळेत पूर्वतयारी मेळावा



**पनवेल : प्रतिनिधी**

नवीन पनवेल पोदी शाळेत बुधवारी सकाळी बौद्धिक टोप्या घातलेली छोटी मुले ढोल-ताशाच्या गजरात लेझिम खेळत पाहुण्यांचे स्वागत करीत असल्याचे पाहून अनेकांच्या भुवया उंचवल्या. शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे शाळापूर्व तयारी या मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याचे समजताच त्याच नजरा त्यांचे कौतुक करताना दिसत होत्या.

नवीन पनवेल महापालिका शाळा क्रमांक ८ पोदी शाळेत बुधवारी शाळेच्या प्रांगणात वैविध्यपूर्ण रांगोळ्यानी सजावट करण्यात आली होती. या ठिकाणी नोंदणी, शारीरिक विकास, बौध्दिक विकास, सामाजिक आणी भावनात्मक विकास, भाषा विकास, गणनपूर्व तयारी मार्गदर्शन स्टॉल होते आणि विशेष म्हणजे फोटो काढण्यासाठी सेल्फी पॉइंटही होता. या वेळी नगरसेविका चारुशीला घरत, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राकेश भुजबळ, महापालिकेचे शिक्षण विभागाचे प्रशासन अधिकारी बाबासाहेब चिमणे, मुख्याध्यापिका अनुपमा डामरे व शिक्षक आणि पालक उपस्थित होते.

मेळावा यशस्वी करण्यासाठी अश्विनी भोईर, अनिता पगारे, प्रगती म्हात्रे, अंजली देसाई, आशा खेडकर, प्रमोद लांगी व राजेंद्र कोळी यांनी मेहनत घेतली.

> **विद्यार्थ्याला आपले स्वत:चे नाव सांगता आले पाहिजे त्याच्या घरात कोण-कोण सदस्य आहेत याची माहिती आहे का? स्वच्छता आणि नीटनिटकेपणा त्याच्यात आहे का? स्वच्छतेची जाणीव आहे का हे पहाण्यासाठी रुमाल, कंगवा, नेलकटर, मास्क व सानिटायझर ठेवले आहे. या वस्तू त्याच्या ओळखीच्या आहेत का? याबाबत त्याला प्रश्न विचारून त्याला माहिती देण्यात येते. त्याला धीटपणे बोलता येण्यासाठी प्रवृत्त करण्यात येणार आहे. याची माहिती पालकांना सामाजिक आणि भावनिक विकास स्टॉलवर देण्यात येते. -अनिता पगारे, शिक्षिका**

## कर्नाटक लोककला महोत्सवामध्ये
# 'नाखवा माझा दर्याचा राजा'ची हॅट्ट्रिक



**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

कर्नाटक येथे ९ ते ११ रोजी साजरा झालेल्या लोककला महोत्सवामध्ये पुन्हा एकदा बेस्ट परफॉर्मन्स हा प्रथम क्रमांकाचा किताब मिळवून हॅटट्रिक साधून दत्ता भोईर आणि त्यांच्या समुहाने महाराष्ट्र राज्याचे नाव उज्वल केले असल्याने सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. भेंडखळ गावाचे सुपुत्र दत्ता भोईर आणि त्यांच्या कलाकार समूहांला या महोत्सवात कोळी व लावणी ही लोककला सादर करण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी देण्यात आली होती. या स्पर्धेत संपूर्ण देशांतून २५ राज्यांनी सहभाग घेतला होता.

कर्नाटक उडपी येथे दक्षिण कन्नडा मोगवीरा महासंघ उडपी यांच्या वतीने महालक्ष्मी उत्सव इंटर झोनल लोककला महोत्सव-२०२२ आयोजित करण्यात आला होता. अखंड भारता मधून २५ राज्यानी या महोत्सवात सहभाग घेतला होता. महाराष्ट्राच्या वतीने नाखवा माझा दर्याचा राजा या कार्यक्रमांतर्गत कोळी व लावणी नृत्यांचे सादरीकरण करण्यात आले होते. बेस्ट परफॉर्मन्स हा प्रथम क्रमांकाचा किताब नाखवा माझा दर्याचा समुहाने मिळवून हॅट्ट्रिक साधली आहे.

महोत्सवाच्या अंतिम दिवशी या कार्यक्रमाच्या समारोहा साठी कर्नाटकाचे मुख्यमंत्री बसराज बोम्मई उपस्थित होते. याप्रसंगी आपले मार्गदर्शनपर विचार मांडताना कर्नाटकाचे मुख्यमंत्री बसराज बोम्मई म्हणाले, २५ राज्यांनी आपआपली पारंपरिक लोककला सादर केल्या परंतु, सादर करणाऱ्या कलाकारांनी आपापल्यापरीने सुंदर अविष्कार सदर केले असले तरी महाराष्ट्राने सादर केलेले कोळी व लावणी नृत्याविष्कार हा या महोत्सवातील बेस्ट परफॉर्मन्स ठरला असल्याने मी त्या समुहाचे सर्वप्रथम कौतुक करून त्यांना शुभेच्छा देतो. ते कर्नाटक उडपी येथे दक्षिण कन्नडा मोगवीरा महासंघ उडपी यांच्या वतीने महालक्ष्मी उत्सव इंटर झोनल लोककला महोत्सव-२०२२ आयोजित प्रसंगी आपले मार्गदर्शनपर विचार मांडताना म्हणाले. समारोहाच्या शेवटी विजेत्या समूहाला सन्मानित करण्यात आले.

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : १७

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).

**१. युक्रेन आणि रशियाकडून गहू आयात करणाऱ्या कोणत्या देशाने आता भारताकडून गहू आयातीचा निर्णय घेतला आहे?**
- **अ.** जर्मनी
- **आ.** ब्रिटन
- **इ.** इजिप्त
- **ई.** क्युबा

**२. शेअर बाजारात गुंतवणूक करण्यासाठी काढावे लागणारे डीमॅट खाते कोणत्या संस्था देतात?**
- **अ.** सेबी आणि रिझर्व बँक
- **आ.** सेबी आणि एनएसडीएल
- **इ.** सेबी आणि सीडीएसएल
- **ई.** एनएसडीएल आणि सीडीएसएल

**३. आठ एप्रिल रोजी संपलेल्या आठवड्यात भारताकडे परकीय चलनाचा साठा किती होता?**
- **अ.** ६०४ अब्ज डॉलर
- **आ.** ६४२ अब्ज डॉलर
- **इ.** ६०० अब्ज डॉलर
- **ई.** ६२५ अब्ज डॉलर

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

## संपादकीय

# नव्या मित्रांच्या शोधात

राजकारणात कोणीही कायमचा शत्रू असू शकत नाही आणि मित्रही. सारे काही मतांचा प्रवाह कुठल्या दिशेने वाहतो आहे यावर अवलंबून असते. समान विचारसरणीचे पक्ष एका बाजूला एकमेकांसोबत उभे राहिले की मतांचे विभाजन टाळता येते हे एक साधे-सोपे गृहितक आहे. त्यानुसारच आजवर आपल्या देशात युती व आघाड्यांची राजकारणे खेळली गेली, पण आता दिवस बदललेले आहेत. समान विचारसरणीच्या पक्षांनीच एकत्र यायला हवे असे काही बंधन उरलेले नाही. याचे ठळक उदाहरण म्हणून महाविकास आघाडीकडेच बोट दाखवावे लागेल.

**शिवसेना ही संघटना खरेतर भारतीय जनता पक्षाशी हिंदुत्वाच्या धाग्याने बांधली गेलेली होती. अयोध्येतील बाबरी मशिदीच्या वादग्रस्त ढाच्याचे निर्मूलन झाल्यानंतर शिवसेना आणि भाजपमधील युतीचे नाते अधिकच घट्ट झाले, पण सत्तेच्या लोभापायी शिवसेनेने हिंदुत्वाची कास सोडून देत थेट काँग्रेसचा हात पकडला आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे घड्याळ स्वत:च्या हातावर बांधून घेतले. निवडणुकीमध्ये एकमेकांवर यथेच्छ टीका करणारे हे तिन्ही पक्ष सत्तेसाठी एकत्र आले आणि केवळ सत्तेसाठीच एकजुटीचे प्रदर्शन करीत आहेत. आगामी काळात मुंबई, पुणे, नाशिक आणि पनवेलसह अनेक महानगरपालिकांच्या निवडणुका तोंडावर आलेल्या आहेत. त्यासाठी शिवसेनेने आता राष्ट्रवादी काँग्रेससोबत आघाडी करण्याचे ठरवले असावे अशी स्पष्ट चिन्हे दिसू लागली आहेत. उणीपुरी चाळीस वर्षे भाजपसोबत सोयरिक करणारा शिवसेना पक्ष आपले हिंदुत्व पार विसरून गेला आहे. हिंदुत्व विसरलेला पक्ष काँग्रेस किंवा राष्ट्रवादी काँग्रेसला आपला वाटणे साहजिकच आहे. अर्थात, आगामी निवडणुकांमध्ये महाराष्ट्रातील मतदारांना नव्या राजकीय मैत्रीची समीकरणे बघायला मिळू शकतील. याचा अर्थ भाजपसारखा पक्ष एकटा पडला आहे असा होत नाही. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेसारखा आक्रमक पक्ष हळूहळू का होईना, पण भाजपशी हातमिळवणी करण्याच्या दृष्टीने एकेक पाऊल पुढे टाकताना दिसतो. मनसेची परप्रांतियांविरुद्धची भूमिका भाजपला बिलकुल सोयीची नव्हती आणि नाही. उत्तर प्रदेश, बिहार येथील कष्टकऱ्यांचे लोंढे मुंबईवर आदळत असल्याने या महानगराचा श्वास कोंडला जात आहे अशी भूमिका मनसेने वारंवार घेतली. त्यामुळे मुंबईत स्थायिक होऊ पाहणाऱ्या उत्तर भारतीय बांधवांना हिंसक प्रसंगांना सामोरे जावे लागले. हा मार्ग भाजपला मान्य नव्हता. तथापि, मनसेने आपला हेका सोडून दिला आहे असे दिसते. एवढा एक मुद्दा सोडला तर भाजप आणि मनसे यांच्यामध्ये मतभेद असण्याचे काही कारणच उरत नाही. किंबहुना, मनसेने नव्याने हिंदुत्वाची दिलेली हाक भाजपसाठी अतिशय मोलाची आहे. मशिदीवरील भोंग्यांचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आणून मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांनी एका अर्थी भाजपच्या दिशेने मोठे सकारात्मक पाऊल टाकले असेच म्हणावे लागेल. गेल्या निवडणुकीमध्ये, 'लाव रे तो व्हिडीओ'चे खेळ करून राज ठाकरे यांनी एकच खळबळ उडवली होती आणि सत्ताधारी भाजपवर टीकास्त्र सोडले होते. तेव्हा हीच काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आनंदाने टाळ्या पिटत होते. सध्याच्या काळात राज ठाकरे यांच्या सभांना आणि त्यांच्या आवाहनांना अभूतपूर्व प्रतिसाद मिळताना दिसत आहे. नजिकच्या भविष्यात मनसे आणि भाजप यांची मैत्री झाल्यास महाविकास आघाडीचे काही खरे नाही हे उघड दिसते.**

# कथा, बेपत्ता होऊन परतलेल्या लोखंडी पुलाची!



**खबरबात**
**शैलेश पालकर**

पोलादपूर तालुक्याच्या मुख्य गावाची ग्रामपंचायत असलेल्या पोलादपूरमध्ये नगरपंचायत झाल्यानंतर झालेल्या रस्त्यामुळे वापरात नसलेला लोखंडी पूल सोमवारी काही व्यक्तींनी ग्रामस्थांच्या डोळ्यांदेखत कापून एका परिचित वाहनातून चोरून नेल्यानंतर बुधवारी पोलादपूर नगरपंचायतीच्या विरोधी गटनेत्यांनी मुख्याधिकारी महादेव रोडगे यांच्याकडे लेखी तक्रारवजा निवेदन देऊन संबंधितांविरुद्ध कारवाईची मागणी केली आहे. पोलादपूर तालुक्यात यापूर्वीही लोखंडी पूल चोरी करणाऱ्याचा फोटो गळ्यामध्ये पाटी बांधून पोलादपूर पोलीस ठाण्यातील काचेच्या नोटीस बोर्डवर लावण्यात आला असताना आता काय घडणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

पोलादपूर ग्रामपंचायतीने पार्टेकोंड-सावंतकोंड भागातील विद्यार्थी तसेच ग्रामस्थांना पायी तसेच दुचाकीवरून शहराशी संपर्कात राहण्यासाठी जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागामार्फत साधारणपणे ५०-६० फूट लांबीचा आणि नऊ फूट रूंदीचा एक लोखंडी पूल बांधून घेतला होता. यानंतर नगरपंचायत अस्तित्वात आल्यावर या भागात रस्ता करण्यात आल्याने लोखंडी पुलावरील रहदारी बंद झाली. गेल्या काही वर्षांपासून वापराविना असलेल्या या लोखंडी पुलाकडे रस्त्यावरून जाणाऱ्या व येणाऱ्या स्थानिक लोकांचे लक्ष असे. सोमवारी सायंकाळी पोलादपूर नगरपंचायतीचा लोकप्रतिनिधी या ठिकाणी येऊन पाहणी करून गेला आणि रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास एक ओळखीचे वाहन येऊन गेले. दुसऱ्या दिवशी मंगळवारी हा लोखंडी पूल नटबोल्ट कापून चोरीला गेल्याचे स्थानिक ग्रामस्थांच्या लक्षात आले. याबाबत पोलादपूर नगरपंचायतीचे विरोधी गटनेता दिलीप भागवत, नगरसेवक स्वप्नील भुवड आणि ॲड. सचिन हांडे यांच्या निदर्शनास ही बाब स्थानिक ग्रामस्थांनी आणून दिल्यानंतर या चोरीस गेलेल्या लोखंडी पुलासंदर्भात माहिती घेतल्यानंतर जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने हा पूल बांधल्यानंतर नगरपंचायतीच्या निर्मितीनंतर हा पूल नगरपंचायतीकडे वर्ग केल्याचे समजून आल्याने पोलादपूर नगरपंचायतीच्या विरोधी गटनेते दिलीप भागवत यांच्या लेटरपॅडवरून मुख्याधिकारी पोलादपूर नगरपंचायत यांना या लोखंडी पुलाच्या चोरीसंदर्भात कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

पोलादपूर नगरपंचायतीचे मुख्याधिकारी महादेव रोडगे यांनी या निवेदनाची दखल घेऊन गुरुवारी सकाळी जाऊन लोखंडी पुल नटबोल्ट कापून चोरून नेल्याच्या घटनास्थळी पाहाणी केली असून पुढील कारवाई सुरू असल्याची माहिती प्राप्त झाली.

पोलादपूर तालुक्यात यापूर्वी साधारणपणे २५ वर्षांच्याआधी बाजिरे ते रानवडीदरम्यानचा एक लोखंडी पूल कापून विकण्यात आल्याच्या घटनेमध्ये आरोपीला अटक करून गुन्हा दाखल केल्यानंतर शिक्षेला पाठविण्यात यशस्वी झालेल्या पोलादपूर पोलिसांनी पोलीस ठाण्याबाहेरील सूचनाविषयक काचेच्या कपाटामध्ये आरोपीचा फोटो तब्बल पुढे पाच वर्षे ठेवला होता. पूर्वीच्या लोखंडी पूल चोरीची आठवण या लोखंडी पुलाच्या चोरीमुळे जागी झाल्याने पोलादपूर शहरातील या लोखंडी पुलचोरासोबत आताचे पोलीस काय भूमिका घेतात याकडे पोलादपूरवासीयांचे लक्ष लागले आहे.

गेल्या काही वर्षांपासून महाड-पोलादपूरच्या सत्तास्थानाची जिल्ह्यातील सत्तास्थानासोबत सुरू झालेल्या पोस्को कंपनीच्या भंगारयुध्दाची चर्चा शिगेला पोहचली असताना पोलादपूर तालुक्यामध्ये एलॲण्डटी या मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या ठेकेदार कंपनीकडून अनेकदा स्टीलचोरी झाल्याच्या तक्रारी झाल्या. ज्या वेळी पुलाचा शोध घेण्याची जबाबदारी सुव्यवस्थेवर आली होती त्याच रात्री अन्वेषणाने अन्वयार्थ साधल्याने लोखंडी पुल पुन्हा मूळजागी पोहचविण्याची जबाबदारी लीलया पार पाडण्यात आली.

पोलादपूर शहरातील पार्टेकोंड ते सावंतकोंडदरम्यानचा एक लोखंडी पूल चार दिवसांपूर्वी चोरीला गेल्याची तक्रार नगरपंचायतीकडून पोलादपूर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आल्यानंतर शनिवारी रात्रीच्या अंधारात काही अज्ञात व्यक्तींनी याच पुलाच्या ठिकाणी या पुलाचे अवशेष आणून टाकले आहेत. आरोपीला अटक करण्याऐवजी मुद्देमाल छिन्नविछिन्न स्वरूपात घटनास्थळी पुन्हा हजर झाल्याने सर्वश्रुत अज्ञात आरोपीविरोधात कायदेशीर कारवाई होण्याऐवजी त्याचा बचाव करण्यासाठी झालेल्या प्रयत्नांची सर्वत्र चर्चा सुरू आहे.

या चोरीस गेलेल्या लोखंडी पुलासंदर्भात पोलादपूर नगरपंचायतीच्या विरोधी गटनेते दिलीप भागवत यांच्या लेटरपॅडवरून नगरपंचायत यांना मुख्याधिकारी या लोखंडी पुलाच्या चोरीसंदर्भात कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. नगरपंचायतीचे प्रशासकीय अधिकारी महादेव सरंबळे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार या प्रकरणी पोलादपूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करून हवालदार वाय.व्ही.चव्हाण यांनी सहाय्यक निरीक्षक प्रशांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली ७ एप्रिल रोजी रात्री पावणेबारा वाजण्याच्या सुमारास भा.दं. वि.३७९, ४२७ कलमान्वये अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. यानंतर पोलिसांनी गटनेता भागवत आणि नगरसेवक स्वप्नील भुवड यांचे जबाबही नोंदविले.

पोलादपूर पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर शनिवारी रात्रीपासून सुरु झालेल्या हालचालींचा अशाप्रकारे काल शेवट झाल्याने रविवारी घटनास्थळी गटनेते दिलीप भागवत, नगरसेवक संतोष चव्हाण, सचिन दुदूस्कर, अभि गरूड, अमोल भुवड, दिनेश पाटील, सचिन गायकवाड आदींनी चोरीला गेलेला लोखंडी पुल परत जागेवर तुकडेतुकडे स्वरूपात आल्याचे पाहण्यासाठी भेट दिली. या वेळी भुवड यांनी, पोलादपूर पोलीस ठाण्याला या चोरीप्रकरणी कोणते वाहन होते, कोण कोण सहभागी होते याबाबत सर्वच माहिती जबाबावेळी दिली.

या प्रकरणात आरोपीला अटक न झाल्यास तसेच हे प्रकरण कायद्याच्या कक्षेत येऊनसुद्धा रफादफा झाल्यास उपोषण व आंदोलनाचा मार्ग अवलंबिण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे पुढे काय होणार याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.



## बदलते तंत्रज्ञान



### नेटफ्लिक्स आणखी स्वस्त होणार?

गेल्या काही दिवसात ओटीटी कंपन्यांमध्ये स्पर्धा वाढली आहे. त्यामुळे चांगल्या कंटेंटसह स्वस्त ओटीटी प्लॅटफॉर्मकडे ग्राहकांचा कल वाढला. त्यामुळे ही स्पर्धा आणखी तीव्र झाली आहे. कंपन्या आता ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी आपल्या प्लानच्या किमती कमी करत आहे. या दिशेने नेटफ्लिक्सनेही पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.




गेल्या काही दिवसांत कमी झालेली ग्राहकांची पुन्हा रुळावर आणण्यासाठी एक योजना आखली जात आहे. नेटफ्लिक्सला दशकाहून अधिक काळातील पहिला ग्राहक तोटा सहन करावा लागला आहे, ज्यामुळे त्याचे शेअर्स २५ टक्के घसरले. जाहीर झालेल्या तिमाही कमाईच्या अहवालानुसार जानेवारी ते मार्च या कालावधीत कंपनीच्या ग्राहक संख्येत २,००,००० ग्राहकांची घट झाली आहे. ओटीटीवर दोन प्रकारच्या वेब सिरीज आणि चित्रपट प्रसारित केले जात आहेत. जाहिरात आधारित आणि ग्राहक आधारित असे प्लान आहेत. मनोरंजनाचा मजकूर फुकट पाहतात त्यांना मध्येच जाहिराती पहाव्या लागतात आणि ज्यांना जाहिरातीशिवाय चित्रपट आणि वेब सिरीज बघायच्या आहेत, त्यांना त्यासाठी अधिकचे पैसे द्यावे लागतात.

ग्राहकांचा ओढा वाढवा यासाठी जाहिरातींसह कमी किमतीत प्लान तयार करण्याची योजना आहे. सहसीईओ रीड यांनी सांगितले की, ग्राहकांना स्वस्त पर्याय उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. यामुळे पुन्हा एकदा ग्राहकांचा कल वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

नेटफ्लिक्ससाठी आशिया ही सर्वांत लहान बाजारपेठांपैकी एक आहे. नेटफ्लिक्सच्या सबस्क्रायबरच्या बाबतीत सर्वांत मोठी बाजारपेठ उत्तर अमेरिका, लॅटिन अमेरिका आणि नंतर युरोप आहे. नेटफ्लिक्सचे आशियामध्ये एकूण ३.२६ कोटी सबस्क्रायबर आहेत, जे त्याच्या एकूण सबस्क्रायबर संख्येच्या १४ टक्के आहे. नेटफ्लिक्सचे एकूण २२.१८ कोटी सबस्क्रायबर आहेत. नेटफ्लिक्स आता आपली वाढ आणि ग्राहकांची संख्या वाढवण्यासाठी आशियासह इतर बाजारपेठांवर लक्ष केंद्रित करीत आहे.

# भारतीय नागरी सेवा दिन विशेष

२१ एप्रिल १९४७ रोजी स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी दिल्लीतील मेटकाफ हाऊसमध्ये नागरी सेवकांच्या पहिल्या गटाला संबोधित केले होते. त्या दिवसाची आठवण म्हणून २००६ पासून हा दिवस नागरी सेवा दिन म्हणून नियमितपणे साजरा होत आहे.

दरवर्षी २१ एप्रिल रोजी भारतामध्ये नागरी सेवा दिन पाळला जातो. प्रशासकीय सेवेत स्वत:ला सार्वजनिक सेवेसाठी समर्पित असलेल्या लोकांच्या सन्मानार्थ हा दिन साजरा केला जातो. भारतीय नागरी सेवेचे दोन भाग आहेत. पहिला अखिल भारतीय सेवा. यात तीन सेवा आहेत. भारतीय प्रशासकीय सेवा (आयएएस), भारतीय पोलीस सेवा (आयपीएस), भारतीय वनसेवा (आयएफओए). दुसरा भाग केंद्रीय सेवा. यात गट अ व गट ब यात विभागलेल्या सुमारे १७ सेवा येतात. उदा. राजस्व सेवा, पोस्टल सेवा, माहिती सेवा, व्यापार सेवा इ. नागरी सेवा दिनाचा एक भाग म्हणून दरवर्षी पंतप्रधानांच्या हस्ते सार्वजनिक प्रशासनात उत्कृष्टतेसाठी पारितोषिके नागरी सेवकांना देण्यात येतात.

भारतीय प्रशासकीय सेवा (इंडियन सिव्हिल सर्व्हिसेस किंवा आयएएस) ही भारत सरकारची नागरी सेवा आहे. आयएएस ही तीन अखिल भारतीय सेवांपैकी एक आहे (भारतीय पोलीस सेवा व भारतीय वन सेवा या इतर दोन सेवा आहेत). आयएएसला भारताच्या लोकप्रशासनामध्ये असाधारण



महत्त्व आहे. केंद्रीय सरकारच्या व राज्य सरकारांच्या नागरी रचनेत बरीच महत्त्वाची पदे आयएएस अधिकारी सांभाळतात.

## निमित्त

आयएएस अधिकाऱ्यांची निवड नागरी सेवा परीक्षेद्वारा (सिव्हिल सर्व्हिसेस एक्झॅमिनेशन) केली जाते. संघ लोक सेवा आयोग (युनियन पब्लिक सर्व्हिस कमिशन) ही भारत सरकारची संविधानिक संस्था सरकारी अधिकाऱ्यांची निवड व नियुक्ती करण्यास जबाबदार आहे. आयएएस अधिकारी बनण्यासाठी इच्छुक उमेदवारांना नागरी सेवा परीक्षेचे प्राथमिक परीक्षा, मुख्य परीक्षा व मुलाखत हे तीन भाग पूर्ण करावे लागतात.

आयकर अधिकारी, राजदूत व परराष्ट्र सचिव, केंद्र सरकारच्या विविध खात्यांतील सल्लागार, जिल्हाधिकारी, निवडणूक अधिकारी अशी काही प्रमुख पदे आयएएस अधिकारी भूषवितात. या सेवेमध्ये रुजू होण्यासाठीची परीक्षा भारतातील केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे घेतली जाते.

केंद्रीय लोकसेवा आयोग किंवा संघ लोकसेवा आयोग ही भारत संघ राज्याची निवड संस्था आहे. ही संस्था अखिल भारतीय सेवा तसेच संघ सेवेच्या गट 'अ' व गट 'ब' कर्मचाऱ्यांच्या निवडीकरिता जबाबदार आहे. हा आयोग 'कर्मचारी, लोक तक्रारी आणि निर्वाहभत्ता मंत्रालयातील' 'कर्मचारी आणि प्रशिक्षण विभाग' यांच्या अधिपत्याखाली येतो.

या संस्थेची सनद भारतीय राज्यघटना, भाग १४, अनुच्छेद ३१५-३२३ मध्ये दिलेली आहे. त्यास 'संघ व राज्यातील सेवा' असे नामकरण आहे. हा संवैधानिक आयोग आहे म्हणजेच आयोग भारतीय संविधानातील तरतुदीनुसार स्थापन झाला आहे. भारत सरकार संघ सेवेतील (गट 'अ' व गट 'ब') तसेच अखिल भारतीय सेवेतील कर्मचाऱ्यांच्या नेमणूक, बदली, पदोन्नती व शिस्तीची कारवाई इ.करिता लोक सेवा आयोगाशी सल्लामसलत करते. हा आयोग थेट राष्ट्रपतींना अहवाल साधार करतो तसेच आयोग राष्ट्रपतीमार्फत सरकारला सल्ले देऊ शकते, पण असे सल्ले बंधनकारक नसतात. संवैधानिक संस्था असल्याकारणाने केंद्रीय लोकसेवा आयोग हा भारतीय न्यायव्यवस्था व निवडणूक आयोग याप्रमाणेच स्वायत्त आहे.

'लोकसेवा आयोग' या नावाने १ ऑक्टोबर १९२६ रोजी स्थापना. नंतर भारत सरकार कायदा १९३५ नुसार 'फेड्रल संघराज्य लोकसेवा आयोग' असे नामकरण आणि शेवटी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर 'संघलोकसेवा आयोग' असे नाव बदल झालेले आहेत.

## क्लिक...क्लिक...!



**मुरूड : खराब हवामानामुळे कोळी बांधवांनी आपल्या बोटी समुद्रकिनारी शाकारून ठेवल्या आहेत. अलिकडच्या काळात मच्छीमारांना सातत्याने खराब हवामानाचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे बाजारात मासळीचे प्रमाणही सध्या कमी दिसून येते.** (छाया : सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर

### थकव्याची कारणे व उपाय



हल्ली अनेक लोकांमध्ये सतत थकवा जाणवण्याची समस्या पाहायला मिळत आहे. खरेतर यामागे अनेक कारणे आहेत. सर्वांत पहिले आणि मुख्य कारण म्हणजे शारीरिक कमजोरी किंवा झोप पूर्ण न होणे. यामुळे सतत थकवा जाणवतो. जर तुम्हालाही सतत थकवा जाणवत असेल, तर हे तुमच्या आरोग्यासाठी नुकसानदायक आहे. आज आपण अशा काही टिप्स जाणून घेऊया ज्यामुळे तुम्ही या समस्येपासून सुटका मिळवू शकता.

तुम्हाला नेहमी थकवा का वाटतो याचे उत्तर शेवटी सापडते. खरेतर यामागे अनेक कारणे आहेत. सर्वप्रथम तुमच्या शरीरातील कमजोरी किंवा झोप न लागल्यामुळे तुम्हाला नेहमी थकवा जाणवतो. जर तुम्हाला नेहमी थकवा जाणवत असेल, तर ते तुमच्या आरोग्यासाठी अजिबात चांगले नाही. चला तर मग जाणून घेऊया अशा टिप्स ज्याद्वारे तुम्ही या समस्येपासून सुटका मिळवू शकता.

जेव्हा आपण हायड्रेटेड नसतो तेव्हा आपले शरीर नेहमी थकल्यासारखे वाटते. उन्हाळ्यात तुम्हाला यासारख्या अधिक समस्या येऊ शकतात. म्हणूनच उन्हाळ्यात तुम्ही तुमचे शरीर हायड्रेटेड ठेवावे. दिवसभरात जास्तीत जास्त पाणी प्या. यामुळे तुमचा थकवा दूर होईल आणि तुम्हाला फ्रेश वाटेल.

याशिवाय तुम्ही हेल्दी डाएट खात नाही, ज्यामुळे तुम्हाला थकवाही जाणवतो. अशा परिस्थितीत जंक फूड आणि प्रक्रिया केलेले अन्न न खाण्याचा प्रयत्न करा.

तुमच्या शरीरात काही आवश्यक पोषक तत्वांची कमतरता असली तरी तुम्हाला दिवसभर थकवा जाणवेल. वास्तविक, जेव्हा शरीरात व्हिटॅमिन-डीची कमतरता असते तेव्हा तुम्हाला थकवा जाणवतो.

पुरेशी झोप घेतली नाही तरी दिवसभर थकवा जाणवतो. झोपेच्या वेळी तुमचे शरीर आवश्यक ग्रोथ हार्मोन सोडते, ज्यामुळे तुम्हाला दुसऱ्या दिवशी उत्साही वाटते.

शरीरातील ऊर्जा कमी होत आहे असे जेव्हा तुम्हाला वाटत असेल तर तुम्ही कॅफिनयुक्त पेये घेऊ नये. फक्त थकवा किंवा उर्जेसाठी कर्बोदकांचे पदार्थ खाऊ नका. यासाठी काही हेल्दी फूड्स कॉम्बिनेशनची निवड करा. याशिवाय तुमच्या आहारात भरपूर पोषक तत्वांचा समावेश करा. अधिकाधिक पाणी प्या. यामुळे तुमच्या शरीरातील ऊर्जा टिकून राहते.

(छाया : अनिस मनियार)



# दीक्षांती प्रणाली जैनची पेणमध्ये मिरवणूक; आमदार रविशेठ पाटील परिवाराकडून स्वागत



पेण : प्रतिनिधी

शहरातील कापड व्यापारी रवींद्र जैन मुलगी मुमुक्षू प्रणाली रवींद्र जैन (वय २८) हिचा दीक्षा महोत्सव कार्यक्रम गुरुवारी (दि. २१) आचार्य भगवान श्री देवकीर्ती सुरीश्वर महाराज तसेच साध्वी परमवर्धना श्री. जी. महाराज यांच्या उपस्थितीत होत असून यानिमित्त बुधवारी (दि. २०) प्रणाली जैन व उपस्थित महाराज, साध्वींची पेण शहरात भव्य मिरवणूक काढण्यात आली होती.

आमदार रविशेठ पाटील, नगराध्यक्ष प्रितम पाटील, उपनगराध्यक्ष वैशाली कडू, माजी जि.प. सदस्या कौसल्याताई पाटील, भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, नगरसेविका अॅड. तेजस्विनी नेने, नगरसेवक दर्शन बाफणा यांच्यासह पेणमधील अनेक मान्यवरांनी जैन महाराज व साध्वीचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले तसेच दीक्षांती प्रणाली जैन हिचे स्वागत केले.

ढोल, ताशा, पारंपरिक वाद्य व भक्तीगीते म्हणत काढलेली ही मिरवणूक शहरातील महावीर मार्ग, गांधी मंदिर रोड, पेण नाका, नरदास चाळ, पं. का. पाटील चौकमार्गे क्रीडा संकुल पोचली. तेथे या मिरवणुकीची सांगता करण्यात आली. दर्शन बाफना व जैन समाजाच्या वैशिष्ट्यपूर्ण सहकार्याने काढलेल्या मिरवणुकीचे प्रत्येक चौकात लोकांनी स्वागत करून आशीर्वाद घेतले.

---

सिडको
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

## (भूखंड वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजने अंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **करारनामा / वाटपपत्र** करणे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे / हिस्सा क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्यस्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **ता. पनवेल, जि. रायगड** | | | | |
| १ | उलवे ८३ | गव्हाण ४५३ | ४१/१(२) | १-२१-५<br>०-३६-२ | १४०० चौ.मी. प्रस्तावित | भूखंड क्र. २७१, सेक्टर-१९, क्षेत्र १४०० चौ.मी. | **कै. रतन बारकू कोळी व कै. चांगुणा रतन कोळी(फडकर)(मयत)**<br>१. श्री. सुनिल रतन कोळी (फडकर)<br>२. श्रीमती शैलजा जयवंत कोळी<br>३. श्रीमती शर्मीला दिलीप भगत<br>४. श्री. मयुर रतन कोळी (फडकर) | |
| | | | **एकूण** | **१-५७-८** | | | | |
| २ | तळोजा ५७९ | पेंधर १६ | १७७/१+२/C | ०-३-० | ४० चौ.मी. | भूखंड क्र. ३७, सेक्टर-२३, क्षेत्र ४० चौ.मी. | सह. दुय्यम निबंधक, पनवेल-२, दस्त क्र. १६५७/२०२२ हे हक्कसोडनुसार **शमी अ. रेहमान खामकर** | |
| ३ | तळोजा ९६१ | तळोजा ३८६ | २४९/१ | १-१५-३ | १००० चौ.मी. | भूखंड क्र. ३३, सेक्टर-५, क्षेत्र-१००० चौ.मी. | सह. दुय्यम निबंधक, पनवेल-३, दस्त क्र. १६३८/२०२१ व दस्त क्र. ७०२४/२०२१, हे हक्कसोडनुसार **कै. हुसैनमिया सुलेमान शेख (मयत) यांचे वारस**<br>**कै. अबिदाबी हुसेन शेख (मयत)**<br>**कै. इरफान उस्मान शेख (मयत) यांचे वारसांपैकी**<br>१) शहाबुद्दीन हुसेन शेख<br>२) फातीमा उस्मान शेख<br>३) जुलेखाबिबी अ. रेहमान शेख<br>४) नुरजहा उमर शेख<br>५) सहिदा कबीर शेख<br>६) मिनाज इरफान शेख | निरंक |
| ४ | करंजाडे (संचिका क्र. १८१) | ९३ करंजाडे | ७E/१ | ०-००-२ | २५५० चौ.मी. पैकी २०५० चौ.मी. | मौजे करंजाडे नोड, भूखंड क्र.१३, से.४, क्षेत्र-२०४९.९२ चौ.मी. | **मूळ भूधारक**<br>**१) श्री. मोहन कावळ्या घोरपडे**<br>**२) गणा उर्फ गणेश कावळ्या घोरपडे (मयत) व हिराबाई कावळ्या घोरपडे (मयत)**<br>२.१ कुंदा गणेश घोरपडे<br>२.२ मनोज गणेश घोरपडे<br>२.३ आकाश गणेश घोरपडे<br>**३) हौशी उर्फ हौसाराम कावळ्या घोरपडे (मयत)**<br>३.१ हर्षदा हौसाराम घोरपडे<br>३.२ स्वप्निल हौसाराम घोरपडे<br>३.३ स्वप्नाली हौसाराम घोरपडे<br>३.४ प्रिया हौसाराम घोरपडे<br>३.५ सुप्रिया हौसाराम घोरपडे<br>**४) अंबिबाई उर्फ शारदाबाई कानु ठोकळ (मयत)**<br>४.१ दिपक कानु ठोकळ<br>४.२ लता मधुकर गोंधळी<br>**५) काळूराम गणू घोरपडे (मयत) यांचे वारस चांगूणाबाई काळूराम घोरपडे व माणिक काळूराम घोरपडे (मयत) यांचे वारस**<br>५.१ सुनंदा माणिक घोरपडे<br>५.२ निकीता संदिप खुटले<br>५.३ अंकिता राऊत हुद्दार<br>५.४ जयेश माणिक हुद्दार<br>५.५ मिन्नाथ काळूराम घोरपडे<br>५.६ शोभा नरेश ठाकूर<br>**६) अनुबाई कावळ्या घोरपडे उर्फ अनुसयाबाई नारायण बहिरा**<br>**७) झिपरीबाई गोपीनाथ खुटले** | SCS ३६५/२०१०<br>SCS ८२/२०१०<br>SCS १९७/२०१० |
| | | ९१ करंजाडे | ७D/२ | ०-०७-३ | | | | |
| | | ८२ करंजाडे | १४/१ | १-१४-९ | | | | |
| | | SR/१२/१५, करंजाडे | १४/५<br>२४/१<br>२४/३ | ०-१६-१<br>०-९०-०<br>०-६५-३ | | | | |
| | | | **एकूण संपादित क्षेत्र** | **२-९३-८** | | | | |
| ५ | उलवे ५२० | न्हावे ७० | अ/६७३, १अ/५४ | ०-५६-० | ५०० चौ.मी. प्रस्तावित | भूखंड क्र.११६, सेक्टर-१९, क्षेत्र-५२८ चौ.मी. | **कै. काना काळूराम भोईर व कै. शांताबाई काना भोईर (मयत)**<br>श्री. नारायण कान्हा भोईर<br>श्री. चंद्रकांत कान्हा भोईर | |
| | | | **एकूण** | **०-५६-०** | | | | |
| ६ | उलवे ९३ | उलवे ५२ अ | ८०/१ | ०-१२-८ | १०० चौ.मी. प्रस्तावित | भूखंड क्र.६२, सेक्टर-२०, क्षेत्र-१०० चौ.मी. | **श्री. चिंतामण गंगाराम पाटील** | |
| | | | **एकूण** | **०-१२-८** | | | | |
| ७ | द्रोणागिरी १५७३ | काळाधोंडा ८९ | ५९/१ | ०-१५-६ | १३६.५० चौ.मी. पूर्णांकात १५० चौ.मी. | भूखंड क्र.६१, सेक्टर-५१, क्षेत्र-१५० चौ.मी. | **कै. लक्ष्मीबाई लक्ष्मण भोईर (मयत) यांचे वारस**<br>१. श्री. हरिश्चंद्र लक्ष्मण भोईर<br>२. सौ. जयाबाई भास्कर पाटील<br>३. सौ. ताराबाई कमळाकर पाटील<br>४. सौ. सविता सदानंद पाटील<br>५. सौ. हिरुबाई हसुराम पाटील | निरंक |

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र./ हिस्सा क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | वाटप/करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | वाटप/करारनामा संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्यस्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **ता. उरण, जि. रायगड** | | | | |
| ८ | भेंडखळ | (II) १६६/८२ | २४३/२<br>२५२/३<br>२५७/१७<br>२५८/५ब<br>२६०/१२<br>२६५/१४<br>२८६/११<br>२८४/६<br>३०९/५<br>६७/४<br>३१९/५ | ०-०५-४<br>०-०३-१२<br>०-०३-०<br>०-१५-०<br>०-०७-८<br>०-०५-४<br>०-०८-०<br>०-०९-८<br>०-०८-८<br>०-२४-१२<br>०-०९-८ | १४४९.६१ चौ.मी. पूर्णांकात १४५० चौ.मी. | द्रोणागिरी येथील सेक्टर क्र. ४७, भूखंड क्र.३३बी, क्षेत्र - १४५० चौ.मी. या इरादित भूखंडाची वाटपाची पुढील प्रक्रिया सुरु आहे | **मूळ भूधारक कै. आत्माराम गणपत घरत (मयत) यांचे वारस**<br>१. श्री. मच्छिंद्रनाथ उर्फ मच्छिंद्रनाथ आत्माराम घरत<br>२. श्री. सदानंद आत्माराम घरत<br>३. श्री. गणेश आत्माराम घरत<br>४. श्रीमती प्रमिला रमाकांत ठाकूर<br>५. श्रीमती वनिता बाळाराम ठाकूर व<br>**कै. जगन्नाथ गणपत घरत (मयत) यांचे वारस**<br>१. श्री. प्राण जगन्नाथ घरत<br>२. श्रीमती प्रतिभा जगन्नाथ घरत<br>३. श्री. मनोज जगन्नाथ घरत<br>४. सौ. अनिता अमर कडवे<br>५. सौ. भारती अनिल पाटील | निरंक |
| ९ | भेंडखळ | ७अ/ ८३-८४ | १४५-६<br>१२४-३<br>१२८-९<br>१३२/६ब | ०-२७-९<br>०-८-०<br>०-१८-९<br>०-०६-६ | १४४९.६१ चौ.मी. पूर्णांकात १४५० चौ.मी. | | | |
| १० | भेंडखळ | ९ | १५५/३ | ०-१३-२ | | | | |
| | | | **एकूण** | **१-७५-५** | | | | |

| अ. क्र. | संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र./ हिस्सा क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | वाटपपत्र देण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | भूखंडाच्या वाटपाशी संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार संपादित संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **नोड - द्रोणागिरी** | | | | |
| ११ | ११९९ | डोंगरी ९४ | १५/७<br>२३/२८ | ०-०९-८<br>०-०८-० | १५० चौ.मी. | द्रोणागिरी भूखंड क्र.८९, सेक्टर क्र. ५३, क्षेत्र - १४९.९९ चौ.मी. | **मूळ भूधारक**<br>**१) कै. चांग्या नानु पाटील (मयत) मृत्यू दिनांक २६.०४.१९९५ यांचे वारस- ५४/२०१०**<br>**दिवाणी चौकशी अर्ज क्र. ५४/२०१०**<br>१.१ श्री. प्रकाश चांगा पाटील<br>१.२ श्री. पंढरीनाथ चांगा पाटील<br>१.३ मच्छिंद्र चांगा पाटील<br>**१.४ हरेश्वर चांगा पाटील (मयत)**<br>१.४.१ वनिता हरेश्वर पाटील<br>१.४.२ रेश्मी हरेश्वर पाटील<br>१.४.३ वैभवी हरेश्वर पाटील<br>१.५ सुरेखा उर्फ कमळाबाई चांगा पाटील<br>**२) कै. हरिश्चंद्र नानु पाटील (मयत) मृत्यू दिनांक १४.०१.२०२० यांचे वारस- १०१५/२०२१**<br>**दिवाणी चौकशी अर्ज क्र. १०१५/२०२१**<br>२.१ प्रभाकर हरिश्चंद्र पाटील<br>२.२ संगीता घनशाम शेळके<br>२.३ जयश्री तुकाराम भोईर<br>२.४ राधीका राजेश गुरव<br>२.५ वैभवी धर्मेंद्र पाटील<br>२.६ रंजना हाडक्या भगत<br>२.७ प्राची प्रकाश बागवे<br>**३) कै. भाऊ नानु पाटील (मयत) मृत्यू दिनांक ०३.०२.२०१२ यांचे वारस- १७१/२०१२**<br>**दिवाणी चौकशी अर्ज क्र. १७१/२०१२**<br>३.१ पदीबाई भाऊ पाटील<br>३.२ दयानंद भाऊ पाटील<br>३.३ धनाजी भाऊ पाटील<br>३.४ महेंद्र भाऊ पाटील<br>३.५ करुणा भाऊ पाटील<br>**४) ताराबाई कमळ पाटील**<br>**५) कै. विनोद कमळाकर पाटील (मयत) मृत्यू दिनांक १६.०८.२००५ यांचे वारस- ८५/२००७**<br>**दिवाणी चौकशी अर्ज क्र. ८५/२००७**<br>५.१ गुलाब विनोद पाटील<br>५.२ विनीत विनोद पाटील<br>५.३ करिश्मा विनोद पाटील<br>५.४ तृनाली विनोद पाटील<br>५.५ वृषभ विनोद पाटील<br>**६) विष्णु कमळ पाटील**<br>**७) गणेश कमळ पाटील**<br>**८) भामिनी कमळ पाटील**<br>**९) कै. कमळ उर्फ कमळाकर नानु पाटील (मयत) मृत्यू दिनांक ०१.१०.१९९३ यांचे वारस- ५८८/२०१९**<br>**दिवाणी चौकशी अर्ज क्र. ५८८/२०१९**<br>९.१ ताराबाई कमळ उर्फ कमळाकर पाटील<br>९.२ विष्णु कमळ उर्फ कमळाकर पाटील<br>९.३ गणेश कमळ उर्फ कमळाकर पाटील<br>९.४ भामिनी कमळ उर्फ कमळाकर पाटील उर्फ सौ. कामिनी अशोक पाटील<br>९.५ गुलाब विनोद पाटील<br>९.६ विनीत विनोद पाटील<br>९.७ करिष्मा विनोद पाटील<br>९.८ तृनाली विनोद पाटील<br>९.९ वृषभ विनोद पाटील<br>**सदर भूखंड वाटपाकरिता वर नमूद भूधारकांपैकी खालील नमूद भूधारकांच्या नावे वाटपपत्र मिळण्याकरीता**<br>**१. श्रीमती पदीबाई भाऊ पाटील**<br>**२. श्री. मच्छिंद्र चांगा पाटील स्पे.मु. क्र. ४२६/२०१९ च्या दाव्याच्या निशानी क्र. १९ कोर्टाच्या तडजोड पुरशीसनुसार व**<br>**३. श्री. प्रभाकर हरिश्चंद्र पाटील यांना उरंन -२८२६-२०२१, पावती क्र. ३६१७, नोंदणी दि. १७.०९.२०२१ हक्कसोड पत्रकानुसार मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.** | निरंक |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहेत. तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत लेखी स्वरुपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करुन करारनामा/●वाटपपत्र करुन देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेण्यात येणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र.१०, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**(रायगड)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/०३४/२०२२-२३

## निवडक



### उरणचे संजय साळुंखे सेवानिवृत्त

**उरण :** उरण विनायक केगाव येथील संजय दत्तात्रय साळुंके हे जेएनपीए कंपनीत असिस्टंट टेक्निशियन या पदावर कार्यरत होते. २७ वर्षे नोकरी करुन त्यांनी कंपनीतून विशेष स्वेच्छानिवृत्ती घेतली. त्यांचा सेवानिवृत्ती कार्यक्रम जेएनपीए मल्टीपर्पज हॉलमध्ये झाला. या कार्यक्रमास नवी मुंबई महापालिका माजी सभापती मोहन म्हात्रे, जेएनपीएचे विश्वस्त भूषण पाटील, दिनेश पवार यांच्यासह साळुंके परिवार, नातेवाईक व मित्रमंडळी उपस्थित होते.

### खारघमध्ये महिलेचे मंगळसूत्र खेचले

**पनवेल** : खारघरमधील एका ६० वर्षीय महिलेच्या



गळ्यातील मंगळसूत्र आणि सोनसाखळी खेचून चोरट्यांनी पळ काढला. सेक्टर १८मध्ये ही घटना घडली. तेथे राहणाऱ्या शोभा प्रेमराज राऊत (वय ६०) या नेहमीप्रमाणे फेरफटका मारण्यासाठी घराबाहेर पडल्यानंतर मैदान आणि माऊली सोसायटीलगतच्या रस्त्यावर समोरून आलेल्या महिलेशी संवाद साधत होत्या. त्या वेळी मोटरसायकवरून आलेल्या चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र आणि सोनसाखळी खेचून पळ काढला. या चोरी प्रकरणी शोभा राऊत यांनी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

### उरण येथे उद्या आरोग्य मेळावा

**उरण :** राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत ग्रामीण रुग्णालय उरण आयोजित आरोग्य मेळावा व सर्व रोग निदान शिबिर शुक्रवारी (दि. २२) सकाळी १० ते सायंकाळी ५पर्यंत सिडको प्रशिक्षण केंद्र बोकडवीरा (ता. उरण) येथे होणार आहे. केंद्र शासनाच्या सुचनेनुसार स्वातंत्र्याचा महोत्सव साजरा करण्याचा भाग म्हणून रायगड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात आरोग्य मेळावे आयोजित करण्यात आले आहेत. या मेळाव्यात शल्य चिकित्सा, बालरोग, अस्थिरोग, दंतचिकित्सा, प्रसूती व स्त्रीरोग, कान-नाक-घसा, नेत्र चिकित्सा, त्वचा रोग आदी तपासणी केली जाणार आहे. नावनोंदणी सिडको प्रशिक्षण केंद्र बोकडवीरा-उरण केंद्रामध्ये करावी. गरजू रुग्णांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन कमिटीद्वारे करण्यात आले आहे.

# राज्य सरकारी कर्मचारी आक्रमक

## मागण्या मान्य न झाल्यास २ मेपासून काम बंद आंदोलन

**उरण : प्रतिनिधी**

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य न झाल्यास २ मेपासून महाराष्ट्रातील सर्व नगरपालिका कर्मचारी बेमुदत काम बंद आंदोलन करणार आहेत. या लढ्यासाठी सज्ज रहा, असे महाराष्ट्र राज्य नगरपंचायत, नगर परिषद व संवर्ग कर्मचारी समितीचे मुख्य संघटक संतोष पवार यांनी म्हटले आहे.

महाराष्ट्र राज्य नगरपंचायत, नगर परिषद कर्मचारी व संवर्ग कर्मचारी संघर्ष समितीचे निमंत्रक डॉ. डी. एल. कराड, रामगोपाल मिश्रा, डी. पी. शिंदे, ॲड. सुरेश ठाकूर आणि ॲड. सुनील वाळूंजकर यांच्या नेतृत्वाखाली संघर्ष समितीचे राज्याचे मुख्य संघटक संतोष पवार यांनी बुधवारी (दि. २०) नगरविकास विभागाचे प्रधान सचिव महेश पाठक यांची मंत्रालयात भेट घेऊन सर्व नगर परिषदा आणि नगरपंचायतींमधील कामगार कर्मचारी यांच्या विविध न्याय्य मागण्यांसाठी



निवेदन सादर केले.

संघर्ष समितीने केलेल्या मागण्या मान्य करून सन्मानपूर्वक योग्य तोडगा निघण्याच्या दृष्टीने मंत्रालयीन स्तरावर उच्चस्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात यावे; अन्यथा कोणत्याही परिस्थितीत २ मेपासून महाराष्ट्रातील सर्व नगरपालिका कर्मचारी बेमुदत काम बंद आंदोलन करण्याच्या तयारीत असल्याचे संतोष पवार यांनी सांगितले. त्यावर नगरविकास विभागाचे प्रधान सचिव महेश पाठक यांनी लवकरात लवकर आपल्या मागण्यांबाबत बैठक आयोजन करण्यात येईल असे आश्वासन देऊन ज्या दिवशी आयुक्त तथा संचालक नगर परिषद प्रशासन संचालनालय (वरळी) यांनी आपल्या संघर्ष समितीस चर्चेसाठी २२ एप्रिल रोजी बोलावण्यात आले आहे. याच दिवशी मंत्रालयीन स्तरावरही आपली बैठक घेण्याबाबत आश्वास्त केले.

मागण्या मान्य न झाल्यास कोणत्याही परिस्थितीत २ मेपासूनचे बेमुदत काम बंद आंदोलन होणारच आहे. त्यामुळे संघटनेचे निमंत्रक व मुख्य संघटक जोपर्यंत कोणताही निर्णय अधिकृतरित्या आपणास कळवत नाहीत, तोपर्यंत आंदोलनाची तयारी युद्ध पातळीवर चालूच ठेवणे आवश्यक असल्याचे पवार यांनी म्हटले आहे. संघर्ष समितीचे सर्व कामगार नेते, अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांनी आंदोलनाची तयारी जोरात करावी, असे आवाहनही त्यांनी केले आहे.



# नवी मुंबईत रक्तदान, हृदय तपासणी शिबिर

## भाजपच्या उपक्रमाला प्रतिसाद

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष प्रभाग क्र ३४च्या विद्यमाने गणेश नाईक ब्लड डोनेशन चेन यांच्या वतीने रक्तदान शिबिर आणि ५५ वर्षांच्या वरील व्यक्तींसाठी मोफत हृदय तपासणी शिबिराचे आयोजन नेरूळ एल मार्केट सेक्टर ८मधील भाजप कार्यालय येथे ॲड. गणेश रसाळ यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते. या आरोग्यदायी उपक्रमास नागरिकांनी मोठा प्रतिसाद लाभला .

युवा नेते व माजी नगरसेवक सुरज पाटील, भाऊ ठाकूर यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या उपक्रमाचे आयोजन सीताराम गायकवाड, निलेश पवार, राजेश बोरले, नारायण धोंडे, नवनाथ मांढरे, हरिश्चंद्र पाटील, महादेव खेडकर, एकनाथ बोरगे, अब्दुल नाईक, दिलीप धोंडे, तुकाराम जाधव, प्रमोद भोयर, हेमलता जाधव, योगिता रसाळ, गीता भोयर, सूर्यमती पाठक, साधना रसाळ यांनी केले होते. या शिबिरास शुश्रूषा हॉस्पिटल आणि त्यांच्या डॉक्टर पथकाचे सहकार्य लाभले.

## खारघरमध्ये रस्त्यावरील गॅरेजवाल्यांवर कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

खारघर परिसरात रस्त्यावर गॅरेज चालविणाऱ्यांवर पोलिसांनी कारवाई सुरू केली आहे. संबंधितांवर अपघातजन्य परिस्थिती निर्माण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खारघर परिसरात अनेक गॅरेजचालक रोडवर वाहने उभी करतात. त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन अपघातजन्य स्थिती निर्माण होते.

या अनधिकृतपणे रोडवर वाहने उभी करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिले आहेत.

त्यानुसार पोलीस पथकाने बेलपाडा सेक्टर ३, कोपरा सेक्टर १० परिसरात रोडवर वाहने उभी केलेल्या गॅरेजचालकांवर रोडवर अपघात होईल अशा धोकादायक स्थितीमध्ये वाहने उभी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. यापुढेही ही कारवाई सुरू राहणार असल्याचे पोलिसांकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# नवी मुंबईत ५० दिवसांत शून्य कोरोना मृत्यू

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

शहरात कोरोनाचे २,०४९ मृत्यू झाले आहेत. कोरोनाच्या तिन्ही लाटेत कोरोना मृत्यूंचे प्रमाण हे दिवसाला सरासरी दोन ते चार इतके होते. मात्र तिसरी लाट ओसरल्यानंतर आता मृत्यूंचे हे सत्र थांबले आहे. गेल्या ५० दिवसांत शहरात कोरोनाचा एकही मृत्यू झालेला नाही.

कोरोनाची तिसरी लाट झपाट्याने वाढली व तितक्याच वेगाने ओसरली आहे. दैनंदिन कोरोना रुग्णांची संख्या शून्यावर आली आहे. डिसेंबर २४पासून सुरू झालेली तिसरी लाट तितक्याच वेगाने ओसरल्यामुळे

### नागरिकांना दिलासा

दिलासा मिळाला आहे. एकंदरीतच कोरोनाच्या कार्यकाळात आतापर्यंत सर्वाधिक मृत्यू ६० वर्षांवरील नागरिकांचेच झाले आहेत.



**नवी मुंबई शहरात मागील दोन वर्षांत दैनंदिन रुग्णसंख्या शून्यावर आली. कोरोनाची स्थिती अत्यंत नियंत्रणात आहे. मागील जवळजवळ ५० दिवसांत एकाही नागरिकांचा कोरोनामुळे मृत्यू झाला नाही, ही समाधानकारक बाब आहे. पालिका प्रशासनाचे प्रयत्न व नागरिकांचे सहकार्य यामुळेच कोरोनावर मात करण्यात पालिकेला यश प्राप्त झाले आहे.**
**-अभिजीत बांगर, आयुक्त, नवी मुंबई महापालिका**

नवी मुंबईत कोरोनाचा पहिला रुग्ण १३ मार्च २०२० रोजी सापडला तर पहिला मृत्यू १५ मार्च २०२० रोजी झाला. तेव्हापासून दोन वर्षे कोरोनाचे शहरात थैमान सुरू होते. यात अनेकांना जीव गमवावा लागला आहे.

० ते १० वयोगटातील फक्त एका मुलाचा कोरोनामुळे मृत्यू झाला तर सर्वाधिक मृत्यू ज्येष्ठ नागरिकांचे झाले आहेत. तिसऱ्या लाटेत कमी कालावधीत मोठ्या प्रमाणात रुग्ण वाढल्याने पुन्हा शहरातील कोरोना केंद्रे सुरू करण्यात आली. महिनाभरातच वाशी वगळता इतर केंद्र बंद करण्यात आली. शहरात एक लाख ५१ हजारांच्या पुढे कोरोनामुळे बाधितांची संख्या झाली असून २०४९ इतके मृत्यू झाले. आता गेले ५० दिवस शहरात एकही कोरोना मृत्यू झालेला नाही.

# कडक उन्हाळ्यामुळे लिंबू महागले; आवक कमी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कडक उन्हाळा सुरू असल्याने लिंबाला मोठी मागणी आहे. मात्र बाजारात मागणीच्या तुलनेत आवक होत असल्याने दर वाढले आहेत. मागील आठवड्याच्या तुलनेत मोठ्या प्रमाणात आवक घटली आहे. प्रतिनग दहा रुपये लिंबू मिळत आहे. या एकूणच महागाईमध्ये गृहिणींचे बजेट कोलमडले आहे.

मार्च महिन्यामध्ये घाऊक बाजारात लिंबू प्रतिकिलो ४० ते ६० रुपये इतके दर होते. त्यानंतर त्यात वाढ होत ६० ते रुपये झाली. एप्रिल महिन्याच्या सुरुवातीला उन्हाचा तडाखा वाढल्याने लिंबाला मागणी वाढल्याने दर आणखी वाढत प्रतिकिलो १२५ ते १५० रुपयांपर्यंत गेले. यावर्षी उष्मा वाढल्याने शरिराला थंडावा देणाऱ्या वस्तूमध्ये वाढ झाली आहे. त्या मुळे लिंबू दरातही वाढ झाली आहे.

विशेष म्हणजे लिंबाची दरवाढ होण्याचे मुख्य कारण म्हणजे उत्पादन कमी झाल्याने बाजारात मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी आहे. त्याचप्रमाणे अवकाळी पावसाचा फटकाही फळांला बसला आहे. यंदा अवकाळी पावसाने लिंबाच्या बागांना अपेक्षित पालवी फुटली नाही. परिणामी उत्पादन मोठ्या प्रमाणात घटले आहे. त्यातच यंदा उन्हाच्या तडाख्यामुळे लिंबांना मोठ्या प्रमाणावर मागणी वाढल्याने दरवाढ झाल्याचे सांगण्यात आले. दरम्यान ५० रुपयास ५ या दराने आम्ही लिंबू विकतो तर लहान आकाराचे ५० रुपयास ६ नग आम्ही विकतो असे लिंबू विक्रेते सांगत आहेत.

### घरातील बजेट कोलमडले

***किरकोळ बाजारात ते आणखी महाग विकले जात असल्याने आता लिंबू विकत घेताना विचार करावा लागत आहे. जेवतांना, उन्हाळा खूप असल्याने सरबतसाठी लिंबू लागतेच. लिंबू महाग झाल्याने घरातील बजेट कोलमडले, असे काही महिलांनी बोलताना सांगितले.***









**पनवेल : कडक उन्हाळ्यामुळे दिवसेंदिवस उष्णतेचे प्रमाण वाढत आहे. दुपारच्या वेळी तर सूर्यदेवता जणू आग ओकत असते. त्यामुळे अंगाची लाही लाही होते. उष्म्यापासून दिलासा मिळावा यासाठी लोक थंडपेयांचा आस्वाद घेतात. यामध्ये वेगवेगळी सरबते, ऊसाचा रस यांना पसंती दिली जाते. नागरिक या पेयांचा आस्वाद घेत असताना त्यांची लक्ष्मण ठाकूर यांनी टिपलेली चित्रझलक.**

# आयशरच्या डीलरशिपचे उद्घाटन

## एव्ही मोटर्सचा मुंबई आणि महाराष्ट्रात विस्तार

**पनवेल : वार्ताहर**

व्हीई कमर्शिअल व्हेइकल्सच्या व्यवसायिक युनिट आयशर ट्रक्स आणि बसेसने एव्ही मोटर्सच्या नवीन डीलरशिपचे उद्घाटन केले, जे पनवेलजवळील पळस्पे फाटा आणि वसई (मुंबई) महाराष्ट्र या ठिकाणी आहे. या दोन्ही ठिकाणी एस (सेल्स, सर्व्हिस आणि स्पेअर्स) अशी सेवा उपलब्ध होणार आहे. पनवेल आणि वसईमधील ही ठिकाणे एनएच ४८वर मोक्याच्या ठिकाणी वसलेली आहेत ज्यामुळे या प्रमुख महामार्गावर चालणाऱ्या आयशर ट्रक आणि बसेसला या ठिकाणी सहज येणे शक्य आहे. या अत्याधुनिक सुविधा आयशरच्या ग्राहकांना सर्वोत्कृष्ट दर्जाची सेवा देण्यासाठी आयशरच्या विस्तृत श्रेणीतील नेक्स्ट जनरेशन सीव्ही वाहने, आणि स्पेअर पार्ट सेंटर आणि पूर्णत: सुसज्ज मल्टी- वे वर्कशॉप्स शोरूमसाठी मोठी जागा उपलब्ध आहे.

या वेळी बोलताना व्हीईजीव्हीचे एमडी आणि सीईओ विनोद अग्रवाल म्हणाले की, बृहन्मुंबई प्रदेश हा भारतातील औद्योगिक क्षेत्रांपैकी महत्वाचा एक विभाग असून कार्यक्षम व्यावसायिक आणि सार्वजनिक वाहतूक या ठिकाणी मोठ्या प्रमाणात असते. या भागातील वाहतुकीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आम्ही



आयशर ट्रक आणि बस ग्राहकांना २४ तास सेवा देण्यासाठी दोन ठिकाणी सुविधा केंद्र उघडले आहे. आम्ही आयशर कुटुंबात एव्ही मोटर्सचे स्वागत करतो आणि आमच्या आयशर ट्रक आणि बस ग्राहकांना उत्तम परतावा आणि नफा मिळवून देणाऱ्या फ्लीट उत्पादकता आणि अपटाइम वाढवण्याच्या आमच्या वचनबद्धतेची पुष्टी करतो.


कस्टमर फर्स्ट हे तत्व आयशर बँडसाठी प्रेरक शक्ती आहे आणि आमची अत्याधुनिक डीलरशिप विशेष साधने, डिजीटाइज्ड प्रक्रिया, सर्वसमावेशक स्पेअर पार्ट इन्व्हेंटरी आणि टीमसह सर्वोच्च सेवा मानके सुनिश्चित करणाऱ्या केंद्रीय प्रणालीशी जोडलेले आहेत. आयशर प्रशिक्षित तंत्रज्ञ, २४X७ सपोर्ट प्रदान करतात, असे व्हीईसीव्हीचे एसव्हीपी ग्राहक सेवा अधिकारी रमेश राजगोपालन यांनी सांगितले.

## डॉ. आंबेडकर जयंती साजरी

**उरण : वार्ताहर**

उरण येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३१ जयंती उत्साहात पार पडली. या वेळी बोलताना स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष सचिन वास्कर म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समाजासाठी मोठे योगदान आहे. समाजासाठीचे त्यांचे महान कार्य आहे हे कुणीही विसरणार नाही.

या कार्यक्रमास बौद्धजन पंचायत समिती शाखा क्र. ८४३अध्यक्ष प्रकाश कांबळे उपाध्यक्ष हरेश जाधव, अखिलेश जाधव, चिटणीस विजय पवार, खजिनदार अनंत जाधव, सुरेश गायकवाड, महेंद्र साळवी,रोहन लाड, सुर्यकांत बोरकर, सनी म्हात्रे, आनंद भिसे, हेमांषु गरुड, संकेत गायकवाड,रॉबिन म्हात्रे, दिनेश पवार, महेश भोसले आदी उपस्थित होते. जयंती महोत्सव साजरा करण्यासाठी बौद्धजन पंचायत समिती शाखा क्र. ८४३ व माता रमाई महिला मंडळ उरण बौद्धवाडी यांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३१ वी जयंती निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



# संविधानामुळे सन्मानाची हमी -सुभाष वारे

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

भारतीय संविधान हे देशातील सर्व जाती धर्माच्या नागरिकांना सन्मानाची हमी व विकासाची संधी देणारे साधन असून डॉ. बाबासाहेबांचे हे संविधान देशातील गुंतागुंतीचे प्रश्न सोडविण्यासाठी आजही सक्षम आहे, असे प्रतिपादन सामाजिक कृतज्ञता निधीचे कार्याध्यक्ष सुभाष वारे यांनी केले.

प्रादेशिक उपायुक्त कार्यालय, मुंबई विभाग, कोकण विभागीय माहिती कार्यालय आणि महाराष्ट्र राज्य राजपत्रित महासंघ कोकण भवन शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३१ व्या जयंतीनिमित्त 'सामाजिक समता' कार्यक्रमांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या भारताचे संविधान आणि भारतीय नागरिकांचे कर्तव्य या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. कोकण भवनातील पहिल्या मजल्यावरील समिती सभागृहात आयोजित या कार्यक्रमाच्यावेळी वस्तू व सेवा कर विभागाचे उपायुक्त कमलेश नागरे, कोकण विभागाचे माहिती उपसंचालक डॉ. गणेश मुळे, कोकण भवनचे वैद्यकीय अधिकारी तथा महाराष्ट्र राज्य राजपत्रित महासंघ कोकण भवन शाखेचे सचिव डॉ. गणेश धुमाळ, प्रादेशिक उपायुक्त कार्यालयाच्या सहाय्यक संचालक मिनाक्षी वैद्य आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती राजश्री शाहू महाराज आणि महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांच्या प्रतिमांना मान्यवरांच्या हस्ते पुष्प अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

नागरिकांच्या दृष्टीकोनांतून संविधानाचे महत्व काय आहे हे सांगतांना वारे म्हणाले की, संविधानाबद्दल कौतुकाने बोलण्याचे दिवस राहिलेले



नाहीत, आता संविधान वाचविण्यासाठी बोलणे गरजेचे आहे. संविधानामधील सामाजिक न्यायाची व्याख्या व्यापक आहे. त्यामुळे संविधानाबद्दलचे गैरसमज दूर करण्याची आवश्यकता आहे. एकलव्य, सावित्रीबाई फुले यांच्या शिक्षणाची लढाई पुढे नेण्याचे संविधान हे प्रभावी साधन आहे. वारे यांनी सहज सोप्या पध्दतीने वेगवेगळी उदाहरणे सांगून संविधानातील महत्त्वाचे मुद्दे मांडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिला, बालके तसेच नोकरदार वर्ग यांच्यासाठी संविधानात केलेल्या तरतूदींबाबत वारे यांनी सोप्या शब्दात माहिती दिली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे केवळ दलित, शोषितांचे नेते नसून संपूर्ण मानव जातीला समृध्द व उन्नतीच्या दिशेने घेऊन जाणारे नेते होते. बाबासाहेबांनी संविधानाव्दारे फक्त शोषितांना मुक्त केले नसून संपूर्ण भारतातील समाज यंत्रणेला मोठमोठ्या अडचणींतून मुक्त केले आहे, असेही मत वारे यांनी यावेळी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अश्विनी चौधरी यांनी केले. या कार्यक्रमाला उत्तम प्रतिसाद मिळाला असून कोकण भवनातील अधिकारी, कर्मचारी आदी उपस्थित होते.

# केंद्र शासनाच्या योजनांची माहिती शेवटच्या घटकापर्यंत पोचवा

## कामगार नेते जितेंद्र घरत यांचे आवाहन | खोपोलीत ई-श्रम कार्ड नोंदणी महाअभियान

**खोपोली : प्रतिनिधी**

संघटीत लोकांसाठी काम करणाऱ्या अनेक संघटना आहेत, मात्र असंघटीत कामगार, कष्टकरी लोकांसाठी केंद्रातील भाजप सरकारने ई-श्रम कार्ड योजना राबवून त्यांना न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. खोपोलीतील स्थानिक कार्यकर्त्यांनी या योजनेचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन भाजप कामगार आघाडीचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र घरत यांनी खोपोली येथे केले.


(छाया : विनायक माडपे)

खोपोली शहर भारतीय जनता पक्ष, आपले सरकार सेवा केंद्र, तसेच आत्म दीप बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील पाटणकर चौकात ई-श्रम कार्ड नोंदणी महाअभियानाचे उद्घाटन भाजप जिल्हा कामगार आघाडीचे अध्यक्ष जितेंद्र घरत यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.

भाजप कामगार सेलचे जिल्हा समन्वयक सूर्यकांत देशमुख यांनी उपस्थितांचे स्वागत केले. खोपोली शहरात मोठ्या प्रमाणात निर्माण होत असलेल्या वसाहतीमधील काम गारांना ई श्रमकार्ड योजनेचा फायदा व्हावा, यासाठी कार्यकर्ते प्रयत्नशील आहेत. शासन योजनांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोचण्यासाठी आम्ही प्रयत्न करणार आहोत तसेच खोपोली नगरपालिकेत जास्तीत जास्त प्रतिनिधी निवडून आणण्यासाठी कार्यकर्ते अहोरात्र प्रयत्न करतील, अशी ग्वाही भाजप शहर अध्यक्ष इंदरमल खंडेलवाल यांनी या वेळी दिली.

भाजप कामगार आघाडीचे जिल्हा सरचिटणीस ज्ञानेश्वर साखरे, खालापूर तालुका सरचिटणीस वामन धुळे, काम गार संघटना सचिव समिरा चव्हाण, खोपोली शहर भाजप अध्यक्ष इंदरमल खंडेलवाल, सरचिटणीस हेमंत नांदे, प्रमोद पिंगळे, खोपोली शहर कामगार आघाडीचे अध्यक्ष अनिल कर्णुक, भाजप युवा मोर्चा अध्यक्ष अजय इंगुळकर, महिला मोर्चा जिल्हा कोषाध्यक्ष रसिका शेटे, जिल्हा कार्यकारणी सदस्या स्नेहल सावंत, शहर उपाध्यक्षा अपर्णा साठे, सरचिटणीस अश्विनी अत्रे, चिटणीस सुनिता पाटणकर, सुमिता महर्षी, कोषाध्यक्षा विमल गुप्ते यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते. भाजपचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष श्रीकांत पुरी आणि महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा अश्विनीताई पाटील यांनी महाशिबिराला भेट देऊन उपक्रमाचे स्वागत केले.

# भुवनेश्वर येथील कालव्यात सांडपाणी

## नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यातील भुवनेश्वरमध्ये पाटबंधारे विभागाचा कालवा आहे. हा कालवा सध्या बंद असला तरी त्यात मोठ्या प्रमाणात नागरी वस्तीतील सांडपाणी येत आहे. हे सांडपाणी कालव्यात तुंबुन रहाते. त्यामुळे दुर्गंधी येतेच शिवाय कालव्यात डासांसह अनेक जंतूची पैदास होत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

रोहा शहराच्या लगत असलेल्या वरसे ग्राम पंचायत हद्दीत निवी ते भुवनेश्वरपर्यंत सुमारे दोन किमी लांबीचा पाटबंधारे विभागाचा कालवा आहे. पुर्वी या कालव्याच्या पाण्यावर भातशेती केली जात होती. मात्र आता भुवनेश्वर परिसरातील शेती जावून तेथे मोठ्या प्रमाणात गृहप्रकल्प उभे राहिले आहेत. तर पाटबंधारे विभागाने कालव्यात पाणी सोडणे बंद केले आहे. नागरी वस्ती व गृहप्रकल्पांचे सांडपाणी थेट या कालव्यात सोडण्यात येत आहे. हे सांडपाणी काही प्रमाणात त्याच ठिकाणी तुंबते. ग्रामपंचायतीला सातत्याने कालवा साफ करता येत नाही. हिवाळ्यात व उन्हाळ्यात कालव्यातच सांडपाणी साचते. त्याची दुर्गंधी येतेच, शिवाय डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. यामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.


(छाया : महादेव सरसंबे)

कालव्यातील सांडपाण्या संदर्भात आरोग्या विभागाने पहाणी करून अहवाल सादर करण्याचे आदेश तहसीलदार कविता जाधव यांनी दिले होते. परंतु अद्याप या अहवालाचे काय झाले हे गुलदस्त्यात आहे. या सांडपाण्याचे विल्हेवाट लावण्यासाठी नियोजनबद्ध कृती आराखडा आवश्यक आहे.

# माथेरानमध्ये गरजू आणि विधवा महिलांना धान्य वाटप

**कर्जत : बातमीदार**

माथेरानमधील लाईट रेल्वेचे जनक सर आदमजी पिरभाय एज्युकेशनल अ‍ॅण्ड वेलफेअर फाउंडेशन या संस्थेने येथील गरजू विधवा महिलांना धान्य वाटप केले. संस्थेचे सचिव अब्बासअली हुसेन आदमजी पिरभाय व त्यांच्या मुलाच्या हस्ते हे धान्य वाटप करण्यात आले.

ज्यांच्या घरात कोणीही कमावते नाही, अशा माथेरानमधील ३० विधवा महिलांना फाउंडेशन तर्फे हॉटेल वे साईड येथे धान्य वाटप करण्यात आले.

विधवा महिलांची पूर्ण माहिती गोळा करण्यात आली मग त्यांना कार्ड देऊन हे धान्य वाटप करण्यात आले, असे फाउंडेशनचे सचिव अब्बास अली हुसेन आदमजी पिरभाय यांनी सांगितले. या वेळी पिरभाय परिवारातील अन्य सदस्य उपस्थित होते.


(छाया : संतोष पेरणे)

# रेवदंडा येथील प्रस्तावित डम्पिंग ग्राऊंडला ग्रामस्थांचा विरोध

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा बायपास रस्त्यानजीक मोठा कोळीवाडा ते महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड कार्यालय परिसरातील प्रस्तावित डम्पिंग ग्राऊंडला ग्रामस्थांनी विरोध दर्शविला आहे. या प्रस्तावित डम्पिंग ग्राऊंडविरोधातील निवेदन ग्रामस्थांनी पालकमंत्री, जिल्हाधिकारी, अलिबाग तहसील कार्यालय, पोलीस अधीक्षक, पुरातत्व विभाग, धर्मादाय आयुक्त तसेच रेवदंडा ग्रामपंचायत आणि तलाठी यांना दिले आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, रेवदंडा बायपास रस्त्यानजीक मोठा कोळीवाड ते महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड कार्यालय परिसरात ग्रामपंचायत अंतर्गत कचरा टाकण्यासाठी विकसीत करण्यात येत असलेल्या नवीन प्रस्तावित डम्पिंग ग्राऊंडला स्थानिक मच्छीमारांचा तसेच येथील नजीकच्या रहिवाशाचा विरोध आहे. डम्पिंग ग्राऊंडनजीकचा बायपास रस्ता हा वाहतुकीचा मुख्यः रस्ता असून या मार्गावर मच्छीमार बांधव व स्थानिक नागरिक नेहमी जा-ये करत असतात. या ठिकाणी डम्पिंग ग्राऊंड झाल्यास मच्छीमार बांधव व स्थानिक नागरिकांना नित्याने दुर्गंधीस सामोरे जावे लागेल. परिणामी आजार व विविध साथीचे रोगास निमंत्रण होईल.

प्रस्तावित डम्पिंग ग्राऊंडजवळच पुरातन भुईकोट किल्ला व तटबंदी आहे, तसेच ग्रामदैवत आहे. चिकन विक्रेते कोंबडीची पिसे व निरूपयोगी भाग बायपास रस्त्यावर, तसेच ग्रामदेवतेच्या मंदिराकडे पाणी जाण्याचे मार्गात टाकत आहेत. प्रस्तावित डम्पिंग ग्राऊंडची जागा (सर्व्हे नंबर ४अ/१/अ/ड) ही खारफुटीची झाडोरा क्षेत्र, सिआरझेड बांधीत, वफर झोन क्षेत्र आहे. त्यामुळे या प्रस्तावित डम्पिंग ग्राऊंडला परवानगी देण्यात येऊ नये अशी मागणी या निवेदनात केली आहे.

**ही जागा ग्रामपंचायतीच्या अखत्यारीत असून, तात्पुरता कचरा टाकण्यासाठी ती उपलब्ध करून दिली आहे. या ठिकाणी ओला व सुका कचरा वेगवेगळा करून त्यांची विल्हेवाट लावण्यात येईल.**
**-श्री. दिवकर, ग्रामसेवक, रेवदंडा ग्रामपंचायत**

# माणगाव उतेखोलवाडीत शाळापूर्व तयारी मेळावा

**माणगाव : प्रतिनिधी**

नगरपंचायत हद्दीतील उतेखोलवाडी येथील शाळेत २०२२-२३ या शैक्षणिक वर्षामध्ये पाहिलीत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मंगळवारी (दि. १९) सकाळी शाळापूर्व तयारी मेळावा घेण्यात आला.

शाळापूर्व तयारी अभियान कार्यक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या या मेळाव्यास माणगावच्या नगरसेविका रश्मी मुंढे, सुविधा खैरे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दीप्ती मुंढे, नामदेव खराडे, सामाजिक कार्यकर्ते संतोष खैरे, मुख्याध्यापिका शमिका अंबुर्ले, ज्येष्ठ शिक्षिका नंदिनी वाले, राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षिका विनया जाधव, उपक्रमशील शिक्षिका स्नेहल उतेकर यांच्यासह विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ उपस्थित होते.



# मुरुडमध्ये संगीत समारोह

**मुरूड : प्रतिनिधी**

पै. खाँसाहेब आबीद हुसैन स्मृति संगीत मंडळातर्फे शनिवारी (दि. २३) रात्री ९.३० वाजता मुरूडमधील वसंतराव नाईक महाविद्यालयात संगीत समारोह करण्यात आला आहे.

पै. आबीद हुसैन यांचे शिष्य भव्यानंद भट महाराज (इंदोर), सतीश वर्मा (बऱ्हाणपूर) आणि उल्हास तेलंग (भोपाळ) यांचे या कार्यक्रमात गायन होणार आहे. तसेच प्रसिद्ध साहित्यिका कै. गिरीजा कीर यांच्या स्मरणार्थ कुमार आर्कशी (शिघ्रे) यांना संगीतप्रेमी पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. रसिकांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून यथाशक्ती सहकार्य करावे, असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत भावे व कार्यवाह डॉ. रवींद्र नामजोशी यांनी केले आहे.

# माणगावमध्ये मोफत आरोग्य तपासणी शिबिर

## ३८८ रुग्णांनी घेतला लाभ

**माणगाव : प्रतिनिधी**

आझादी का अमृत महोत्सव कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाच्या सूचनेनुसार आरोग्य विभाग आणि माणगाव उपजिल्हा रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि. १९) येथील उपजिल्हा रुग्णालयात मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. ३८८ गरजू रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला.


(छाया : सलीम शेख)

माणगाव उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रदीप इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांनी रुग्णांची तपासणी केली. डॉ. संतोष कामेरकर, बालरोगतज्ज्ञ डॉ. आबासाहेब पाटणकर, डॉ. तुषार शेठ, डॉ. दीपक देशमुख, स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. श्रुती निकम, डॉ. समीर शेलार, नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. शंतनू डोईफोडे, डॉ. तेजल गायकवाड यांच्यासह रुग्णालयीन कर्मचाऱ्यांनी हे शिबिर यशस्वी करण्यासाठी विशेष सहकार्य लाभले.

# रोह्यात सुवर्णपालवी कृषी महोत्सवाचे आयोजन




**रोहा : प्रतिनिधी**

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त रोहा येथील कृषी विज्ञान केंद्रात १३ ते १७ मे २०२२ या कालावधीत 'सुवर्णपालवी' या नावीन्यपूर्ण कृषी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ हे भारतातील एक नामांकित कृषी विद्यापीठ असून या विद्यापीठाची स्थापना १८ मे १९७२ रोजी झाली. २०२१-२२ हे वर्ष विद्यापीठाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. गेल्या ५० वर्षात विद्यापीठाने कृषी शिक्षण, संशोधन आणि विस्तार या त्रिसूत्रीच्या माध्यमातून कोकणातील शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी मोलाचे कार्य केले आहे. विद्यापीठाने आतापर्यंत विविध पिकांच्या जाती, कृषी औजारे आणि कृषी व तत्सम तंत्रज्ञानाच्या शिफारशी शेतकऱ्यांसाठी प्रसारित केल्या आहेत. सुवर्ण महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून विद्यापीठाने विकसित केलेल्या तंत्रज्ञानाचा प्रसार आणि प्रचार अधिक प्रभाविरित्या व्हावा, या उद्देशाने रोहा किल्ला येथील कृषि विज्ञान केंद्रात १३ ते १७ मे या कालावधीत 'सुवर्णपालवी' या नावीन्यपूर्ण कृषी महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.

शेतकऱ्यांना विद्यापीठाच्या तंत्रज्ञानाबरोबरच इतर संस्थांनी केलेले कार्य, कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती व्हावी यादृष्टीने महाराष्ट्रातील इतर तीन कृषी विद्यापीठे, महाराष्ट्र शासनाचा कृषी विभाग व इतर संलग्न विकास विभाग तसेच कृषी क्षेत्रात कार्यरत असलेल्या खाजगी कंपन्या, निमशासकिय संस्था, महामंडळे, बँका, बचत गट इत्यादी या कृषी महोत्सवात सहभागी होणार आहेत. या महोत्सवामध्ये विद्यापीठाने विकसित केलेल्या विविध प्रक्षेत्रांवर प्रात्यक्षिकांचे आयोजनही करण्यात येणार आहेत. त्याचबरोबर परिसंवाद, चर्चासत्रे, शिवार फेरी, प्रशिक्षण, खाद्यपदार्थ स्पर्धा इत्यादी उपक्रमांच्या माध्यमातून शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

या महोत्सवाच्या उद्घाटन आणि समारोप कार्यक्रमाला राज्यपाल तसेच मुख्यमंत्री, कृषिमंत्री, कृषी राज्यमंत्री, कोकणातल्या पाचही जिल्ह्यांचे पालकमंत्री यांना निमंत्रित करण्यात आले असल्याचे कृषी विज्ञान केंद्राने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

# शहरातील गटारांची कामे तातडीने करावीत

## मुरुडमधील नागरिकांचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

**मुरूड : प्रतिनिधी**

शहरातील जुनी पेठ परिसरातील गटारे बुजली असून या गटारांची कामे तातडीने करावीत, अशी मागणी मुरूड पेठ मोहल्ल्यातील नागरिकांनी नगर परिषदेचे मुख्याधिकारी पंकज भुसे यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

मुरूड जुनी पेठ येथील घरांची उंची रस्त्याएव्हढी असल्याने येथील गटारातील सांडपाणी रहिवाशांच्या घरात शिरते व जीवनावश्यक वस्तूंचे नुकसान होत आहे. सध्या मुरूड शहरातील रस्त्याची कामे सुरु आहेत. त्यामुळे रस्त्यांची उंची वाढणार आहे. रस्त्यांप्रमाणेच रस्त्याच्या दोन्ही बाजूस असलेल्या गटारांची कामेही तातडीने करण्यात यावी, असे पेठ मोहल्ल्यातील नागरिकांनी मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

**मुरूड शहरात जेवढे नवीन रस्ते होणार आहेत, त्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला गटाराचीची कामे अंदाजपत्रकात प्रस्तावित आहेत. पेठ मोहल्ला ते लक्ष्मीखार येथील गटारांची कामे करण्यात येणार आहेत.**
**-पंकज भुसे, मुख्याधिकारी, नगर परिषद मुरूड**

## इंदापुरात मटका जुगारप्रकरणी गुन्हा

**माणगाव :** तालुक्यातील इंदापूर गावात एसटी स्टँडच्या मागे एका झाडाखाली सोमवारी (दि. १८) सायंकाळी मटका जुगाराचा खेळ खेळविताना मिळून आल्याप्रकरणी आरोपीवर माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपी पंकज विजय पतंगे (वय ३६, रा. इंदापूर, ता. माणगाव) हा सोमवारी सायंकाळी विनापरवाना गैरकायदा मटका जुगार खेळवीत असताना मिळून आला. त्याच्यावर माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# आपटवणे गावाजवळ ओढ्यात आढळली औषधे, गोळ्यांची हजारो पाकिटे

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील आपटवणे गावच्या हद्दीत असलेल्या ओढ्यात कॅल्शियम व गर्भनिरोधक गोळ्यांच्या हजारो पाकिटांचा खच टाकण्यात आला आहे. सरपंच शरद चोरघे आणि ग्रामस्थांनी ही बाब निदर्शनास आणली आहे. या प्रकारामुळे ग्रामस्थ संतप्त झाले आहेत.

## ग्रामस्थ संतप्त

ग्रामीण भागात रुग्णांवर उपचारासाठी सरकार मार्फत शासकीय रुग्णालयांना पुरविण्यात आलेल्या कॅल्शियम व गर्भनिरोधक गोळ्यांची ही पाकिटे आहेत. या हजारो पाकिटांची योग्य विल्हेवाट न लावता निष्काळजीपणे फेकून दिली आहेत. त्याबद्दल ग्रामस्थांनी चिंता व्यक्त केली.

**एवढ्या मोठ्या प्रमाणात अशा प्रकारे औषधे टाकून देणे योग्य नाही. आरोग्य विभागाने ही औषधे गरजूंना देणे आवश्यक होते किंवा शास्त्रीय पद्धतीने त्यांची विल्हेवाट लावणे अपेक्षित होते. या बाबत जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी.**
**-शरद चोरघे, सरपंच, ग्रुप ग्रामपंचायत आपटवणे**

**या प्रकाराबाबत अहवाल मागवून चौकशी केली जाईल. आणि जो कोणी दोषी आढळेल त्याच्यावर कारवाई केली जाईल.**
**-डॉ. शशिकांत मढवी, तालुका आरोग्य अधिकारी, सुधागड**


(छाया : धम्मशील सावंत)



आयपीएलच्या रनसंग्राम | आजचा सामना | मुंबई वि. चेन्नई | सायं. ७.३० वा., नवी मुंबई

# बंगळुरूचा लखनऊवर शानदार विजय

## प्लेसिस, हेझलवूड चमकले



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये मंगळवारी झालेल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने लखनऊ सुपर जायंट्सवर १८ धावांनी शानदार विजय झाला. बंगळुरूने १८२ धावांचे लक्ष्य दिलेले असताना लखनऊ संघ १६३ धावा करू शकला. या विजयासाठी बंगळुरूचा कर्णधार फॅफ डू प्लेसिसने फलंदाजीत, तर जोश हेझलवूडने गोलंदाजीत महत्त्वाची भूमिका बजावली.

बंगळुरूने दिलेले १८२ धावांचे लक्ष्य गाठण्यासाठी आलेल्या लखनऊची सुरुवात खराब झाली. सलामीला आलेला क्विंटन डी कॉक तिसऱ्याच षटकात झेलबाद झाला. दुसऱ्या विकेटसाठी आलेला मनीष पांडेदेखील (६) पाचव्या षटकावर स्वस्तात झेलबाद झाला. त्यानंतर कर्णधार केएल राहुल आणि कृणाल पांड्या या जोडीने लखनऊला सावरण्याचा प्रयत्न केला. दोघांनी ३१ धावांची भागीदारी केली. राहुल ३० धावा करून झेलबाद झाल्यानंतर पांड्या आणि दीपक हुडा (१३) यांनी ३१ धावांची भागीदारी करीत संघाला विजयापर्यंत घेऊन जाण्याचा प्रयत्न केला, मात्र पांड्या (४२) ग्लेन मॅक्सवेलच्या चेंडूवर झेलबाद झाल्यानंतर लखनऊचा एकही खेळाडू मैदानात तग धरू शकला नाही. अयुष बदोनी हेझलवूडच्या चेंडूंचा सामना करताना १३ धावांवर बाद झाला. मार्कस स्टॉइनिस वगळता खालच्या फळीतील फलंदाज चांगली धावसंख्या करू शकले नाहीत. मार्कसने २४ धावा केल्या.

बंगळुरूच्या जोश हेझलवूडने गोलंदाजीमध्ये नेत्रदीपक कामगिरी केली. त्याने चार षटकांत २२ धावा देत चार विकेट्स घेतल्या, तर मोहम्मद सिराज, ग्लेन मॅक्सवेल, हर्षल पटेल यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

तत्पूर्वी लखनऊने नाणेफक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. बंगळुरूची सुरुवात खूपच खराब झाली. पहिल्याच षटकात अनुज रावत चार धावा करून झेलबाद झाला, तर दुसऱ्या विकेटसाठी आलेला विराट कोहली एकही धाव न करता शून्यावर परतला. दुसरीकडे सलामीला आलेला फॅफ डू प्लेलिसने मैदानावर पाय रोवत लखनऊच्या गोलंदाजांची धुलाई केली. प्लेसिसने आयपीएलच्या त्याच्या शंभराव्या सामन्यात ९६ धावा केल्या. ६४ चेंडूंमध्ये ११ चौकार आणि दोन षटकार लगवात त्याने ही धावसंख्या उभारली. त्यानंतर ग्लेने मॅक्सवेल (२३), सुयस प्रभुदेसाई (१०), शाहबाज अहमद (२६) यांनी प्लेसिसला साथ देत बंगळुरूला १८१ धावांपर्यंत पोहचवले. दिनेश कार्तिकने आठ चेंडूंमध्ये नाबाद १३ धावा केल्या.

# तळातील संघांमध्ये आज लढत

## मुंबई-चेन्नई आमनेसामने



मुंबई : प्रतिनिधी

आयपीएलच्या यंदाच्या पर्वामध्ये मुंबई इंडियन्सच्या संघाला सलग सहाव्या पराभवाचे तोंड पहावे लागल्याने रोहितचा संघ गुणतालिकेत तळाशीच राहिला आहे. मुंबईवर पहिल्यांदाच सलग सहा सामन्यांमध्ये पराभूत झाल्याची नामुष्की ओढावली आहे. या पराभवाने मुंबईची प्ले ऑफच्या फेरीत जाण्याची शक्यता अजून धूसर झाली आहे. दरम्यान, मुंबईची पुढील लढत गुरुवारी (दि. २२) चेन्नई सुपर किंग्जशी आहे. चेन्नई संघही यंदाच्या हंगामात विजयासाठी झगडताना दिसत आहे.

मुंबई इंडियन्स हा या पर्वामधील असा एकमेव संघ आहे ज्याला अद्याप एकही विजय मिळवता आलेले नाही. सहापैकी सहा सामन्यांमध्ये पराभव झाल्याने मुंबई गुणतालिकेत तळाशी आहे, तर चेन्नईचा संघ पाचपैकी एक सामना जिंकून नवव्या स्थानी आहे.

या संघांना प्ले ऑफबद्दलच्या संधीबद्दल बोलायचे झाले, तर त्यांना चत्मकारच करावा लागेल. यापूर्वी मुंबईने अशा पद्धतीचे चमत्कार करीत प्ले ऑफमध्ये धडक मारल्याने चाहत्यांना संघाकडून अपेक्षा कायम आहेत. असा पराक्रम मुंबईने २०१५मध्ये करून दाखवला होता, मात्र आताची आयपीएल ही १० संघांमध्ये खेळवली जात असून त्यापैकी चारच संघ खेळवले जाणार असल्याने गटांनुसार अंकांचे गणित आणि आकडेमोड पाहता अव्वल चारमध्ये स्थान मिळणे कठीण दिसत आहे.

### प्ले ऑफचा मार्ग खडतर

मुंबईला आता उर्वरित नऊ सामन्यांपैकी केवळ एक सामना गमवण्याची मुभा असून नेट रनरेट चांगला ठेवण्यासाठी मोठ्या फरकाने किमान आठ सामने जिंकावे लागणार आहेत. तरच मुंबई प्ले ऑफमध्ये खेळू शकेल. चेन्नईची कामगिरीही खराब झाली आहे. त्यामुळे त्यांनाही जास्तीत जास्त सामन्यांमध्ये विजय मिळवावा लागेल.

# बाद झाल्यानंतर संतापलेल्या मार्कस स्टॉइनिसने केली शिवीगाळ



**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्धच्या सामन्यात लखनऊ सुपर जायंट्स विजयाच्या जवळ होता, पण मार्कस स्टॉइनिसची विकेट संघाला लक्ष्यापासून दूर घेऊन गेली. स्टॉइनिसला जोश हेझलवूडने बाद करून बंगळुरूला मोठे यश मिळवून दिले. बाद झाल्यानंतर स्टॉइनिस मैदानावरच शिवीगाळ करताना दिसला. हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

हा प्रकार लखनऊ सुपर जायंट्सच्या डावातील १९व्या षटकात घडला आहे. पहिला चेंडू स्पष्टपणे वाईड दिसत होता, जो अंपायरने वाइड दिला नाही. यावर स्टॉइनिस नाराज दिसला. यानंतर पुढच्याच चेंडूवर हेझलवूडने स्टॉइनिसला क्लीन बोल्ड केले. बाद झाल्यानंतर तो खूप रागावलेला दिसत होता आणि शिवीगाळ करताना दिसला. या ऑस्ट्रेलियन फलंदाजाचा आवाज स्टंपच्या माईकमध्ये कैद झाला आहे. पॅव्हेलियनच्या दिशेने जात असतानाही, मार्कस स्टॉइनिस तोंडावर हात ठेवून काहीतरी बोलताना दिसला, परंतु तो कशाबद्दल आणि काय बोलत आहे हे स्पष्ट होऊ शकले नाही.

# लिव्हरपूलविरुद्ध रोनाल्डोची माघार

**मँचेस्टर : वृत्तसंस्था**

मँचेस्टर युनायटेडच्या ख्रिस्तियानो रोनाल्डोने आपल्या नवजात जुळ्या मुलांपैकी एकाचे निधन झाल्यामुळे लिव्हरपूलविरुद्ध लढतीतून माघार घेतली. मुलाच्या निधनाबाबत रोनाल्डो आणि त्याची मैत्रिण जॉर्जिना रॉड्रिगेज यांनी सोमवारी घोषणा केली होती.

'कुटुंब हे सर्वांत महत्त्वाचे आहे आणि या कठीण काळात रोनाल्डोला कुटुंबासमवेत राहायचे आहे. त्यामुळे लिव्हरपूलविरुद्ध एनफिल्ड येथे मंगळवारी झालेल्या लढतीत रोनाल्डो खेळला नाही,' असे मँचेस्टर युनायटेडने म्हटले आहे.

# राष्ट्रीय कबड्डीपटू धर्मराज, श्रीकांतकडून शालेय खेळाडूंना ऑनलाइन मार्गदर्शन

**मुंबई : प्रतिनिधी**

राष्ट्रीय प्रशिक्षक व महान कबड्डीपटू राणाप्रताप तिवारी यांनी वर्ल्ड कप सुवर्णपदक विजेते कबड्डीपटू व विख्यात डावा कोपरारक्षक तामिळनाडूचा धर्मराज चेरलाथन यांच्याशी डावा कोपरारक्षक घडू इच्छिणाऱ्या शालेय खेळाडूंना ऑनलाइन थेट संपर्क करून दिला.

डाव्या कोपरारक्षकाच्या बाजूने बोनस गुण घेऊ इच्छिणाऱ्या प्रतिस्पर्धी चढाईपटूस बोनस रेषेवरच उभे राहून थोपविणे अथवा पकड करण्याची कला अवगत करणे गरजेचे असल्याचे प्रोकबड्डीपटू धर्मराजने सांगून आणखी काही महत्त्वपूर्ण टीप्स दिल्या. अमर हिंद मंडळ-दादर संस्थेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त अमर हिंद मंडळ व आयडियल स्पोर्ट्स अॅकॅडमी आयोजित कबड्डी खेळाच्या मोफत मार्गदर्शन शिबिरासह प्रीमियर लीग




कबड्डी स्पर्धेमधील सत्रात सबज्युनियर खेळाडूंचा उत्साह यामुळे द्विगुणीत झाला.

राष्ट्रीय सुवर्णपदक विजेता भारतीय रेल्वेचा विख्यात प्रो-कबड्डीपटू डावा चढाई बहाद्दर श्रीकांत जाधवनेदेखील डाव्या चढाईचे कसब डावी चढाई करणाऱ्या शिबिरातील शालेय मुलांना ऑनलाइन मार्गदर्शनद्वारे सांगितले. महाराष्ट्राच्या मातीतून अहमदनगर येथील ग्रामीण भागातून भारतीय कबड्डी क्षेत्रात उत्तुंग भरारी घेणाऱ्या श्रीकांत जाधवच्या शुभेच्छा शालेय खेळाडूंना प्रेरणादायी ठरणार आहेत.

१५ वर्षाखालील ४० खेळाडूंचा शालेय प्रीमियर लीग कबड्डीचा विनाशुल्क उपक्रम २५ एप्रिलपर्यंत अमर हिंद क्रीडांगण-दादर (पश्चिम) येथे होत आहे. मुंबईसह ठाणे, भिवंडी, पालघर, पनवेलमधील उदयोन्मुख शालेय खेळाडूंनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्यामुळे निवड चाचणी २१ एप्रिलपर्यंत रंगणार आहे.

प्रशिक्षक राणाप्रताप तिवारी, एकनाथ सणस, सुनील खोपकर, अविनाश महाडिक, विजय राणे यांनी खेळाडूंना कबड्डीचा वॉर्म-अप, सराव सामने, कबड्डीचे मुख्य नियम आदीबाबत माहिती व प्रात्यक्षिके दिली. कबड्डीप्रेमी मयूर पाटील, अमरहिंद मंडळाचे कार्यवाह दीपक पडते, कार्याध्यक्ष अरुण देशपांडे, रवींद्र ढवळे, शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण यांनी शालेय खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

# लखनऊचा कर्णधार राहुलला दंड



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये मंगळवारी झालेल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुने लखनऊ सुपर जायट्सला धूळ चारली. या पराभवाचे शल्य बोचत असतानाच आता लखनऊचा कर्णधार केएल राहुलला आणखी एक झटका बसला आहे. बंगळुरुविरुद्धच्या सामन्यात आचारसंहितेचा भंग केल्याचा ठपका ठेवत राहुलला दंड ठोठावण्यात आला आहे. या दंडात्मक कारवाईप्रमाणे राहुलला सामन्याच्या फीसच्या २० टक्के रक्कम दंड म्हणून भरावी लागणार आहे. राहुलसोबतच मार्कस स्टॉइनिसलाही आयपीएल समितीने फटकारले आहे.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुविरोधातील सामन्यात नियमांची पायमल्ली केल्यामुळे केएल राहुलला आयपीएलने दंड ठोठावला आहे. या दंडानुसार या सामन्यातील फीसच्या २० टक्के रक्कम दंड म्हणून भरावी लागणार आहे. राहुलला कोणत्या कारणामुळे त्याला दंड ठोठावण्यात आला आहे हे अद्याप समजू शकलेले नाही, मात्र लेव्हल १चा गुन्हा केल्याचा ठपका ठेवत त्याच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे. विशेष म्हणजे आयपीएलने जारी केलेल्या निवेदनात राहुलने आरोप मान्य केल्याचे सांगण्यात आले आहे.

**स्टॉईनिसलाही फटकारले**

कर्णधार राहुलबरोबरच लखनऊचा अष्टपैलू खेळाडू मार्कस स्टॉईनिस यालादेखील आचारसंहितेचा भंग केल्यामुळे आयपीएलने फटकारले आहे. २४ धावांवर खेळत असताना त्रिफळाचित झाल्यानंतर त्याने संताप व्यक्त केला होता. याच कारणामुळे आयपीएलने त्याला फटकारले आहे. विशेष म्हणजे त्याच्यावरदेखील लेव्हल १चा गुन्हा केल्याचा ठपका ठेवण्यात आला असून त्याने तो कबूल केला आहे.

# ट्वेन्टी-२० विश्वचषकासाठी कार्तिक उत्तम पर्याय ठरेल

## सुनील गावसकरांकडून प्रशंसा



**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलच्या यंदाच्या हंगामात दिनेश कार्तिकने आपल्या कामगिरीने सर्वांचे लक्ष वेधले आहे. हा अनुभवी यष्टीरक्षक-फलंदाज ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारतासाठी विजयवीराची भूमिका बजावू शकतो, असे मत माजी क्रिकेटपटू गावसकर यांनी व्यक्त केले आहे.

कार्तिक सध्या आयपीएलमधील आपला नवीन संघ रॉयल चॅलेंजर्सकडून खेळत असून जबरदस्त फॉर्ममध्ये आहे. कोलकाता नाइट रायडर्सच्या या माजी कर्णधाराने यंदाच्या हंगामात ३२, १४, ४४, ७, ३४, ६६, ८ अशा खेळी केल्या असून त्यासाठी प्रत्येक डावात कमी चेंडू घेतले. विशेष म्हणजे तो या सात डावांमध्ये सहा वेळा नाबाद राहिला आहे

'ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी भारतीय संघात स्थान मिळवण्यासाठी कार्तिक उत्सुक आहे. माझ्या मते त्याचे वय पाहू नका. तो कसे खेळतो याकडे लक्ष द्या. विश्वचषकात सहाव्या व सातव्या स्थानावरील फलंदाजीच्या क्रमांकाला तो न्याय देत आहे,' असे गावसकर म्हणाले.





पनवेल : तालुक्यातील उसर्ली येथे युवासेना व ग्रामस्थ मंडळ उसर्ली खुर्द यांच्या वतीने गावदेवी उसराई चषक क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. सुप्रसिद्ध सिनेअभिनेत्री सोनाली कुलकर्णी हिच्या प्रमुख उपस्थितीत या स्पर्धेचे मंगळवारी उद्घाटन झाले. या स्पर्धेला भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देत जोरदार फटकेबाजी केली. या वेळी भाजप तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केएल राहुल-अथिया शेट्टी लवकरच विवाहबंधनात?


**मुंबई** : भारतीय क्रिकेटपटू केएल राहुल वेगवेगळ्या कारणांसाठी नेहमीच चर्चेत असतो. सध्या तो लखनऊ सुपर जायंट्स संघाचा कर्णधार असून लवकरच लग्नबंधनात अडकणार आहे. तो आपली प्रेमिका अथिया शेट्टीसोबत विवाह करणार असल्याचे म्हटले जातेय. अथिया ही अभिनेता सुनिल शेट्टीची मुलगी आहे.

अथिया शेट्टी आणि केएल राहुल यापूर्वी अनेकवेळा एकत्र दिसलेले आहे. राहुलच्या वाढदिवशी अथियाने तिच्या सोशल मीडियावर दोघांचे खास फोटो शेअर करीत एक प्रकारे दोघांमधील प्रेमाची कबुलीच दिली होती. तिच्या या फोटोंवर राहुलने लव्ह यू म्हणत तिच्यावरील प्रेम व्यक्त केले होते. लखनऊ सुपर जायंट्सचा सामना सुरु असताना राहुलची फलंदाजी पाहण्यासाठी अथियाने अनेक वेळा हजेरी लावलेली आहे. आता हे देघेही लवकरच लग्नबंधनात अडकणार असल्याचे म्हटले जात आहे. या दोघांच्या विवाहाची तयारीही सुरु झाली आहे. ही जोडी हिवाळ्यापर्यंत साऊथ इंडियन पद्धतीने विवाह करण्याची शक्यता आहे. पिंकविलाने याबाबत अधिक वृत्त दिले आहे.

पिंकविलाने दिलेल्या माहितीनुसार अथिय शेट्टी आणि के एल राहुल या वर्षी म्हणजेच २०२२च्या शेवटपर्यंत विवाह करण्याची शक्यता आहे. असे असले तरी अथियाचे वडील अभिनेता सुनिल शेट्टी यांनी याबाबत मौन बाळगले आहे.

# कार्डिसकडून बार्सिलोनाचा धक्कादायक पराभव

■ ला लीग फुटबॉल स्पर्धेत लुकासचा निर्णायक गोल



**माद्रिद : वृत्तसंस्था**

कार्डिसकडून १-० अशा धक्कादायक पराभवामुळे बार्सिलोनाच्या ला लीग फुटबॉल जेतेपद पटकावण्याच्या अंधुकशा आशा मावळल्या आहेत. गृहमैदानावरील या सामन्यात ४८व्या मिनिटाला लुकास पेरेझने गोल करीत कार्डिसला १-० अशी आघाडी मिळवून दिली. यानंतर बार्सिलोनाकडून गोल करण्याचे प्रयत्न झाले, पण कार्डिसच्या बचावफळीने चांगली कामगिरी करीत अखेपर्यंत आघाडी कायम ठेवत विजय नोंदवला.

बार्सिलोनाच्या कामगिरीची संतप्त चाहत्यांनी हुर्यो केली. गुणतालिकेत अग्रस्थानी असलेल्या रेयाल माद्रिदच्या ते १५ गुणांनी मागे आहे. सध्याच्या हंगामात रेयाल माद्रिदला अजूनही सहा सामने खेळायचे आहेत, तर बार्सिलोनाचे सात सामने शिल्लक आहेत. गेल्या आठवड्यात युरोपा लीगमध्येही त्यांना पराभूत व्हावे लागले होते. बार्सिलोनाला २००३नंतर पहिल्यांदा कॅम्प नोऊ स्टेडियमवर सलग दोन सामन्यांत पराभवाचा सामना करावा लागला आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com